म.ग्रं.सं. वाचनालय, ठाणे
विषय : व्या.क.
दा. क्र. : १८००

32

BVBK-0401800
BVBK-0401800

वाचनालय वा.
१८००
५।६।८५

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
दिनांक ५।६।८५
वा. क्र. ९००
विषय

# शाळेतील भुताटकी

म. ग्रं. सं. ठाणें, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग. ६५
दा. क्र. १८००० दिनांक ५.१८.
विषय ...... ...... क्र........

शैलजा राजे
संपादक : भा. रा. भागवत

BVBK-0401800

मॅजेस्टिक प्रकाशन
मॅजेस्टिक किशोर साहस
आठ रुपये

पहिली आवृत्ती :
फेब्रुवारी, १९७५
सर्व हक्क प्रकाशकाधीन
मुखपृष्ठ व रेखाचित्रे :
अनंत सालकर

प्रकाशक :
अ. के. कोठावळे,
मॅजेस्टिक प्रकाशन,
३१६ प्रसाद चेम्बर्स,
मुंबई

मुद्रक :
अ. के. कोठावळे,
ॐ मुद्रणालय,
२५० अ, शनिवार पेठ, पुणे ३०.



डोळे पुसून म्हणाली, "रडू नकोस हं ! मी तुला नाही काही हसले. मला ताईची आणि आजीची आठवण आली. अग आमची ताई न भारी भित्री आहे. अग एकदा काय झालं..."

"कोण बोलतंय तिकडं ?"

बाईंनी बॅटरीचा उजेड त्यांच्या बाजूनं फेकला. मिंकी पटकन् सुनी-लाच्या पांघरुणात शिरली. बाई उजेड पुढं पुढं सारीत त्यांच्या कॉट-पाशी आल्या. पांघरुण वर उचलून म्हणाल्या, "मीना तू इथं का आलीस ? आपला बिछाना असा सोडायचा नसतो. भीती वाटते का तुला ?"

बाईंचा आवाज काही मिंकीला आवडला नाही. खरं तर त्यांनी तिला मीना म्हणावं हेच तिला आवडलं नव्हतं. सकाळीच तिनं या बाईंना सांगितलं होतं, "बाई माझं नाव जरी मीना असलं ना, तरी सारी मला मिंकीच म्हणतात."

त्यावेळी या बाईंनी मान डोलावली होती. आणि लगेच त्या सगळं विसरल्या होत्या. अशा विसराळू बाईंचंही तिला हसू आलं. ती खुदकन हसली. या बाईंची आपल्याला खूप मजा मजा करता येईल. तिच्या पपांचे एक आजोबामित्र होते. म्हणजे तिच्या आजोबांचेच ते खरे मित्र. पण आता आजोबा देवाघरी गेले होते म्हणून ते पपांचे मित्र झाले होते. ते आजोबामित्र असेच विसराळू होते. मिंकी त्यांची खूप मजा करायची. कधी त्यांची छत्री लपवून ठेवायची तर कधी टोपी. त्यांना वाटायचं आपणच घरी विसरून आलो, मग सगळेच हसायचे.

मिंकी हसली आणि बाई एकदम रागावल्या. म्हणाल्या, "मीना इथं हे असं हसणं चालणार नाही. इथली शिस्त मोठी कडक आहे. चल उठ, जा आपल्या जागेवर."

मिंकीला बाईंचा रागच आला. ती ताडकन् पाय दणदण आपटीत

आपल्या कॉटवर जाऊन झोपली. बाईंनी एकदा तिच्या अंगावर बॅटरीचा उजेड पाडला आणि तिच्यावर मोठाले डोळे करीत त्या निघून गेल्या. बाईंच्या पाठीकडे पाहात मिंकीनं हातभर जीभ लांब काढली, त्यांना वेडावलं आणि मगच तिनं डोळे मिटले.

डोळे मिटले म्हणजे झोप येते आपोआप! तिची आजी असं तिला नेहमी सांगायची. तिची आई आणि पपा प्रथम इंग्लंडला गेले तेव्हा तिला अशीच झोप येत नव्हती. ती रडत नव्हती; पण आजीला म्हणत होती, "आजी ग मला झोपच येत नाही बघ."

"अग डोळे मिटून घे. म्हणजे आपोआप झोप येते."

असं म्हणून आजी तिच्या जवळ येऊन बसली होती. तिनंच मिंकीचे डोळे आपल्या हाताने मिटले होते. आणि ती तिला हळूहळू थोपटत राहिली होती. मग खरच तिला आपोआप झोप लागली होती.

नंतर तिला ही सवयच लागली होती. पांघरुणाचं टोक हाती धरलं की ती आजीला म्हणायची, "आजी माझे डोळे मिटायला ये ग! मग मला आपोआप झोप येते."

पण आज तिनं आजीसारखेच आपल्या हातानं आपले डोळे मिटून घेतले. एका हातात रगाचं टोक धरलं न दुसऱ्या हातानं ती स्वतःला थोपटत राहिली. आणि तरीही तिला झोप येईना. उगाचच सारखं सारखं डोळ्यांतून पाणी येत राहिलं. ती स्वतःवरच चिडली. तिनं लाथेनं पांघरुण भिरकावून दिलं, आणि टक्क डोळे उघडे ठेवून ती त्या काळोखात काही दिसतंय का पाहात राहिली.

तिनं ओळीनं ठेवलेल्या कॉटस् मोजायला सुरुवात केली. एक, दोन, तीन....बाप रे! एकूण वीस कॉटस् आहेत या हॉलमध्ये. म्हणजे आम्ही वीस मुली. या हॉलमध्ये म्हणे पहिली ते चौथीच्या वर्गातल्या सगळ्या मुली झोपतात. तिनं सुनीलाकडे पाहिलं. ती आता झोपली होती

वाटतं. ती तिसरीत आहे. म्हणजे आपल्यापेक्षा लहानच असणार. आपण चौथीत! मग सकाळी तिचे मामा का तिला असं म्हणाले? "बघ ती मुलगी तुझ्यापेक्षा लहान आहे पण रडते का?"

ह्यॅ! काहीतरीच तिच्या मामांचं! मी चौथीत. ती तिसरीत. मग मी कशी लहान! मी मोठीच आहे. तिला बिचारीला घरची फार आठवण येते. आईची! मलाही येते. आईपेक्षा आजीची. तशी आईचीही येते म्हणा. पण पूर्वीसारखी फार नाही. ती सारखी तर पपांच्या बरोबर फिरत असते. त्यामुळे आजीचीच जास्त सवय झाली आहे. मात्र आई आली, जवळ राहिली की मग मात्र ती गेली की काही दिवस अगदी करमत नाही. तरी बरं तिनं आणलेली बाहुली, विमान, मोटार काहीतरी नवं नवं असतंच खेळायला.

पलंगावरनं खाली वाकून तिनं हळूच आपली बॅग पाहिली त्या तिच्या बॅगेत तिनं आपली खूपशी छानछान खेळणी आणली होती. गपचूप! नेहमीसारखा ताईनं खोडा घातलाच होता. म्हणाली होती, "तिथं अभ्यासाला जाणार आहेस की खेळायला आणि मोडून टाकशील सारी खेळणी."

तिनं आजीकडं पाहिलं होतं. पण आजी गप्पच राहिली होती. आईनं महागाई-मोलाची आणलेली खेळणी आपण खेळायला घेऊ नाहीत असंच आजीचं मत! तिला माहीत होतं हे. पण यावेळी तिची आईच समोर उभी होती. ती म्हणाली, "नेऊ दे ग तिला काय हवं ते, तिच्या-साठीच आणलंय ना सारं? मिंकी घे तुला काय पाहिजे ते."

मग आईनं आणि तिनंच सगळी बॅग भरली होती. खूप खूप, छान छान फ्रॉक्स, नवी नवी खेळणी, सगळं तिनं बरोबर आणलं होतं. इथल्या मैत्रिणींशी गट्टी जमली की ती सारी खेळणी बाहेर काढणार होती. त्यांना दाखवणार होती. त्या खूप खूप खेळणार होत्या.

इथंही येतं म्हणे.

मिंकी पडल्या पडल्या सगळं आठवत होती. आपले डोळे असे जड-जड का झाले तेच तिला कळत नव्हतं. काही दिसेनासंच झालं होतं.

## दोन

मिंकीला शाळा आवडली होती. वर्गात तीसच मुली होत्या. बहुतेक सगळ्या आपापल्या घरून येणाऱ्या होत्या. होस्टेलमध्ये राहाणाऱ्या तिच्या वर्गातल्या पाचजणी होत्या. ब वर्गातल्या सहा होत्या. सुनीलाच्या वर्गातल्या फक्त आठच होत्या. अ आणि ब दोन्ही तुकड्या मिळून फक्त आठच आणि त्याही रडक्याच. सर्वात जास्त बेबीच्या वर्गातल्या चिंट्या-पिंट्या. मिंकीला त्या खूप आवडायच्या. त्या बोलायला लागल्या की मिंकी त्यांच्याकडे पाहात राहायची. कशा छान, गोड गोड दिसायच्या त्या. तिच्या त्या चालत्या बोलत्या बाहुलीसारख्या. तिची ती बाहुली तिनं अजून कुणाला नीट दाखवलीच नव्हती. एकदाच तिनं काढली होती. नाचासाठी. पण मग मोठ्या बाई म्हणाल्या, " असं एवढं महागाईचं खेळणं शाळेत उगाच आणलंस तू ! फार काढू नकोस हं."

शाळेतल्या सगळ्या बाईंच्यापेक्षा तिला मोठ्या बाईच जास्त आवडल्या होत्या. त्या छान होत्या. सर्वांशी कशा गोडगोड बोलायच्या. शाळेतल्या सर्व मुलींची नावं त्यांना माहीत होती. त्या वर्गात मिंकीला नेहमी मीना म्हणायच्या, पण एकदा वर्ग सुटला, शाळा संपली की त्या तिला मिंकीच म्हणायच्या. रोज एकदा तरी त्या होस्टेलवर यायच्या. सर्वांची चौकशी करायच्या. कधी कधी तर त्या त्यांच्या पंगतीला

जेवायच्या. मोठ्या बाई जेवायला असल्या की साऱ्या मुली खूष असत. कारण मग त्या ढंगाळ्या बाई कसं छान वागायच्या. वाढप्याला पुन: पुन्हा हाक मारायच्या. दही द्यायच्या. ' साखर हवी का ? ' विचारायच्या.

मिंकी मोठ्या बाईंच्यावर खूष होती. त्यांच्याशी तिची गट्टीही खूप झाली होती. मिंकी खूप खेळायची. खोखोत तर ती पटाईत झाली होती. मोठ्या बाई नेहमी विचारायच्या, ' मिंकी तू खूप खेळतेस, पण अभ्यास करतेस ना ? तुझी आई अभ्यासात हुषार होती हो ! माझ्याच वर्गात होती ती. "

मिंकीला ते ऐकलं की मजा वाटायची. आईच्या दुसऱ्या मैत्रिणींना ती मावशी म्हणायची. पण या मात्र बाई. मोठ्या बाई. पण मोठ्या बाई असल्या तरी त्या खूप वेळा मावशीसारखं वागतात असं ती सुनीलाला नेहमी सांगायची. सुनीला खडतूस चेहरा करून म्हणायची, " तुझं काय बाई ! तुझी आई याच शाळेत होती. म्हणून तू लाडकी आहेस त्यांची. "

" मग ढंगाळ्याबाई काय तुझ्या आईच्या हॉस्पिटलमध्ये होत्या वाटतं, म्हणून त्या तुझ्याशी गोड गोड बोलतात ? आणि मला उगीचच रागवतात. मला त्या मुळीच आवडत नाहीत. "

" पण कोण सांगतंय आवडून देत म्हणून ? गेलीस उडत. आम्हाला पण तुमच्या मोठ्या बाई आवडत नाहीत. आमच्या बाई ढंगाळ्या तर तुमच्या मोठ्या बाई टंगाळ्या.

" अय्या ! ग्रेटच आहेस तू सुनीला. मस्त नाव आहे हं, ढंगाळ्या आणि टंगाळ्या. "

घटकेपूर्वी आपण सुनीलाशी भांडत होतो हे विसरून मिंकी बोलत राहायची. मग त्या दोघी गळ्यात गळा घालून बागेत फिरायच्या. मिंकी सरसर चिंचेच्या झाडावर चढायची. मोठे मोठे चिंचेचे आकडे खाली

टाकायची. चाफ्यावर चढून फुलं काढायची. चिट्या-पिट्या पोरींना द्यायची. कधी कधी दहावी-अकरावीतल्या मुलीही मिंकीला मस्का लावायच्या. म्हणायच्या, " ए मिंकी जरा चढ की झाडावर. देना फुलं काढून. ती ढंगाळी आसपास नाही तोपर्यंत पटकन् चढ. आम्ही आहोत खाली. आल्या तर सांगू तुला. पण नाहीच येणार इतक्यात. मॅटिनीला गेल्या आहेत. "

मग मिंकी झाडावर चढायची. खूपशी फुलं काढायची. सर्वांना वाटून टाकायची. ढंगाळ्या बाई मुलींना विचारायच्या, " सारी फुलं कुठं गेली ? कुणी काढली ? "

मुली लांब चेहरा करून उभ्या राहायच्या. मिंकीला हसू यायचं. मिंकीवर ढंगाळ्या बाईंचा फार राग होता. कारण तिनं एकदा त्यांना सरळच विचारलं होतं, " बाई तुमचं नाव ढंगाळ्या का पडलं सांगू का ? "

आणि यावर बाईंनी मोठे मोठे डोळे करून तिच्याकडे पाहिलं होतं. त्या ओरडल्या होत्या. म्हणाल्या होत्या, " फाजील आहेत साऱ्या कार्ट्या ! माझं नाव ढगे आहे समजलीस ! मी काय ढंगाळी आहे काय ! थांब रिपोर्टच करते तुझ्याबद्दल. "

क्षणभर मिंकी त्यावेळी घाबरली होती. तिच्याबद्दल मोठ्या बाईंचं मत चांगलं होतं. मिंकी खेळात आणि अभ्यासातही हुषार आहे असं त्यांनी तिच्या पपांना मुद्दाम कळवलं होतं. म्हणून मग एकदा पपांनी त्यांच्या अख्ख्या होस्टेलसाठी जिलबीच्या करंड्या पाठवल्या होत्या ढंगाळे बाईही खरं म्हणजे त्या दिवशी खूष होत्या आणि सातवीतली रावी मिंकीच्या कानात बोलली होती, " यातल्या निम्म्या बाईंच्या घरी."

पण मिंकीची त्याबद्दल तक्रार नव्हती. तिची ढंगाळे बाईंच्या बद्दल एकच तक्रार होती. त्या हॉलमध्ये काळाकूट्ट अंधार करतात. दोन्ही हॉल, एक त्यांचा आणि एक मोठ्या मुलींचा दोन्ही रात्रीचे काळेकूट्ट

दिसायचे. तिच्या घरी सगळ्या खोल्यांतून अगदी छोटे छोटे दिवे लावलेले होते. तिला वाटायचं या हॉलमध्ये असा एखादा दिवा असावा. एकदा तिचे आई आणि पपा तिला भेटायला आले होते. आपली तक्रार तिनं सहज पपांच्या कानी घातली. पपांनी लगेच मोठ्या बाईंना लागेल तो खर्च दिला. बाईंनी तिच्या पपांच्या आभाराचं भाषण प्रार्थनेच्या वेळी केलं. मिंकीला त्यावेळी केवढा अभिमान वाटला. पपा गेले तर ती आणि तिच्या कितीतरी मैत्रिणी पपा-आईला अच्छा करीत उभ्या राहिल्या होत्या. आणि मोठ्या बाई मोठ्या कौतुकनं ते सारं पाहात होत्या.

जातांना पपांनी मिंकीला केवढा तरी मोठ्ठा टॉफीचा डबा दिला होता. अकरावीपासून सर्व मुलींना तिनं एकेक टॉफी दिली होती. सगळ्या वसतीगृहात एकूण मुली तरी किती होत्या ? अवघ्या ऐंशी. त्या मुलींना टॉफी वाटून शिवाय तिनं वर्गातल्या आपल्या खास मैत्रिणींनाही दिली. आणि उरलेली तिनं आपल्या बॅगेत ठेवून दिली.

मिंकी तशी खरोखरच उदार होती. कोणताच खाऊ ती एकटी खात नव्हती या वसतीगृहात राहाणाऱ्या सगळ्या मुली आपल्या बहिणीच आहेत अशी तिची भावना होती. विशेषतः तिला तिच्या शेजारी आणि उशाशी झोपणाऱ्या सुनीला-बेबीबद्दल खूपच वाटायचं; कारण या तीन महिन्यांत प्रत्येक मुलीचं कुणी ना कुणी भेटून जातच होतं. मिंकीचे पपा तर चार-पाच वेळा येऊन गेले होते. कामाला आले की ते मिंकीला पाहून जातच होते. जाताना सगळ्या होस्टेलला पुरेल इतका खाऊ देतच होते. आधीच मिंकी मोठी लाघवी होती. त्यात या मिळणाऱ्या खाऊमुळे ती सर्वंच मुलींच्या ओळखीची झाली होती. मिंकी सर्वांशीच गोड वागत होती. आणि तरीही खरं तर मिंकीला जास्त आवडत होत्या बेबी आणि सुनीला. आपल्या वाटणीला मिळणाऱ्या खाऊतली जास्तीत जास्त वाटणी ती त्या दोघींना ठेवायची. दोघीही तो खाऊ खायच्या. पण



घेताना मिंकीला म्हणायच्या, " आम्हाला नाही आवडत तू असं दिलेलं. उगाचच स्वतःला चांगल म्हणावं ना म्हणून करतेस तू हे.

मिंकी त्यांच्या तोंडाकडे पाहात राहायची. बोलायची खरं म्हणजे

सुनीलाच. पण बेबी तिच्या होला हो करीत राहायची. मिंकी बेबीला विचारायची, “हो काय ग ? म्हणून देते का ग मी खाऊ ?”

बेबी नुसतीच मान हालवायची. मग मिंकीला तिचा राग यायचा. ती बेबीला म्हणायची, “नुसतीच मान काय हालवतेस ? तू काय नंदीबैल आहेस ?”

यात बेबीला काही बोलावं, असा खरं तर मिंकीचा मुळीच उद्देश नसायचा. पण सुनीला लगेच ढंगाळेबाईंच्याकडे चुगली करायची.

सुनीला बेबीबरोबरच मिंकीला ढंगाळेबाईंचं नवल वाटायचं. कुणाला त्रास देऊ नाही. शक्यतो आपली कामं आपणच करावी. सर्वांच्यावर प्रेम करावं असं तिची आई तिला नेहमी सांगायची. तिची आजी तिच्याबद्दल सर्वांना सांगायची, “आमची मिंकी ना, जाईल तिथं सर्वांना आपलंसं करील. भारी माया आहे तिच्या पोटात.”

पण इथं पाहावं तर बेबी, सुनीला आणि स्वतः ढंगाळेबाई उगाचच तिच्यावर रागवायच्या. सुनीला चुगली करायची आणि मग ढंगाळेबाई तिला शिक्षा करायच्या. कसलीही. कधी कुणाशी न बोलण्याची, कधी एका कोपऱ्यात नुसतंच उभी राहाण्याची.

मिंकीला अशी शिक्षा झाली, की सगळ्या मुली ढंगाळेबाईंच्यावर चिडायच्या. मोठ्या बाईंना सांगायच्या. मोठ्या बाई मिंकीला बोलवून विचारायच्या, “मिंकी काय झालं ग आज ?”

“कुठं काय बाई ?”

“अग तुला शिक्षा झाली, होती ना ? काय केलंस आज ?”

मिंकी हसायची. आपल्याला शिक्षा झाल्याचे बाईंना कुणी सांगितलं हे विचारायची, न् म्हणायची, “नाही हो बाई ! बाईंनी तशी फार नव्हती शिक्षा केली. माझीच चुकी झाली. मी बेबीला नंदीबैल म्हणाले. मग बाई थोड्या रागावल्या.”

तिला जवळ घेतलं होतं. तिच्या कपाळाची पापी घेतली होती. मिंकी मात्र शांत होती. ही नवी शाळा कशी असेल, आपल्याला नव्या मैत्रिणी किती मिळतील, खेळायला मोकळी जागा असेल का ? आईच्या वेळच्या कुणी बाई असल्या तर त्या कशा असतील ? किती म्हाताऱ्या असतील, या आणि अशाच विचारात ती गढली होती. आई-पपा कायकाय बोलत होते, कायकाय सांगत होते इकडं तिचं मुळीच लक्ष नव्हतं. गाडी थांबली आणि पपा तिला म्हणाले, " हं उतर मिंकी. आली तुझी शाळा.

आईनं दिलेली छोटीशी पर्स हातात घेऊन ती ऐटीत उतरली होती. त्याचवेळी सुनीलाची रिक्षा थांबली होती आणि ही बेबीही एका मोठ्या इम्पाला गाडीतून उतरली होती.

या तिन्ही मुली एकदम आलेल्या पाहून बाईंची खूपच धांदल उडाली होती. त्या प्रथम धावल्या होत्या त्या इम्पालाकडे. बेबीला त्यांनी उतरून घेतली होती.

मग त्या आल्या होत्या पिंकीच्या गाडीजवळ. पिंकीला त्यांनी नाव विचारलं होतं. त्या तिच्या आईशी बोलल्या होत्या. आणि मग त्या सुनीलाच्या रिक्षापाशी गेल्या होत्या. सुनीला रिक्षातून उतरायलाच तयार नव्हती. बरोबर आलेल्या आपल्या आईला तिनं घट्ट धरून ठेवलं होतं आई सारखी तिची समजूत घालीत होती. तिच्याबरोबर आलेले ते दुसरे तिचे बाबा असावेत असं पिंकीला वाटलं होतं; पण ते तिचे मामा होते. कारण आई ऐकत नाही असं पाहिल्यावर सुनीलानं त्यांना धरलं होतं न् ती म्हणाली होती, " मामा मी घरी येते. मला नाही इथं राहायचं. "

मिंकी ते सारं टकमका पाहात उभी होती. आणि त्याचवेळी सुनीलाचे मामा म्हणाले होते, " अग सुनीला ती मुलगी बघ लहान आहे तुझ्याहून पण रडते का ते ! "

त्यावेळी ती रडली नव्हती. आईला, पपांना तिनं हसत हसत टाटा

केलं होतं. आईही म्हणाली होती, " माझी मिंकी खरंच शहाणी आहे."

आईच्या बोलण्याला पपांनी मान डोलवली. मिंकीही त्यावेळी खूष झाली होती. पण आता या काळोखात असं डोळे उघडे ठेवून पडल्यावर तिला कसंतरीच वाटत होतं. किती वेळ झाला, पण नेहमी आपोआप येणारी झोप येतच नव्हती. ती कॉटवर उठून बसली. तिला बाथरूमला जायचं होतं. घरातले सगळे दिवे तिला माहीत होते. ती एकटीच उठायची, भराभर दिव्यांची बटणं दाबायची न् जायची. पण इथं आज तिचा फक्त पहिलाच दिवस होता. सुनीला गेली दोन वर्षं इथंच आहे. तीच मघाशी म्हणाली होती तशी. म्हणाली होती, " अग मी पहिलीत असतानाच इथं आलेय. पण मला नाही आवडत इथं राहायला. "

" मग का राहातेस ? " मिंकीनं विचारलं होतं.

" माझी आई नर्स आहे. तिला हॉस्पिटलमध्ये राहावं लागतं. मामी-जवळ मला ठेवायला ती तयार नाही. "

" तुला आजी नाही ? "

" अं हं ! तुला आहे ? "

" हो पण मीच आले इथं. आजीला त्रास होऊ नाही ना म्हणून. माझे आई–पपा नेहमीच परदेशी असतात. मग आजीलाच सारी कामं करायला लागतात. मग आई म्हणाली, " तू पुण्याला जा. सुनीला माझी आई याच शाळेत होती बरं का ग ! "

संध्याकाळी सुनीलाशी बोलताना आणखीही खूपच गोष्टी कळल्या होत्या. त्या बेबीला आईच नव्हती आपल्या हॉलमधल्या दोन मुली चोरट्या आहेत. त्या नेहमी काहीना काही कुणाचं तरी चोरतच असतात; पण अजून कुणी त्यांना पकडूच शकत नाही. कारण त्या दोन मुली कोण हेच आतापर्यंत कुणाला कळत नाही. पण कुणीतरी दोघी आहेत हे नक्कीच आणि शिवाय या शाळेत म्हणे भूतही आहे. ते कधी कधी

मिंकीला वाटलं उठावं, बॅग उघडावी आणि त्यातली ती वॉकीटॉकी डॉल बाहेर काढावी. तिला पुढ्यात घेऊन निजावं. असली चालती-बोलती बाहुली कुणाजवळ नसेलच. किती छान आहे आपली बाहुली. केस तर इतके सुरेख आहेत. मऊ मऊ! ताईच्या कशिद्याच्या रेशमासारखे: आणि डोळे तर एकदमच मस्त आहेत.

कितीतरी वेळ मिंकी आपल्या बाहुलीचाच विचार करीत होती. तिची कॉट भिंतीकडे होती. अगदी टोकाला. तिच्या डोक्याशी एक आडवी कॉट होती. तिच्यावर एक छोटीशी मुलगी झोपली होती. अगदी गाढ! काय बरं तिचं नाव? खरं नाव काही कळलं नव्हतं. तिला पोचवायला आलेला माणूस तिला म्हणाला होता, "बेबी मी जातो."

आणि त्या एवढ्याशा मुलीनं सरळ मान हालवली होती. टाटासुद्धा केला नव्हता. बाईंचा हात धरून ती सरळ वर्गात गेली होती. माळ्यानं तिचं सामान उचललं होतं. या बेबीनं मागे वळूनसुद्धा पाहिलं नव्हतं. मिंकी त्याही वेळेला अशीच तिच्याकडे नवलानं पाहात राहिली होती. एकाच वेळी त्या तिघी शाळेच्या फाटकात शिरल्या होत्या. ती, सुनीला आणि ही बेबी.

मिंकीला पोचवायला स्वतः पपा आले होते. त्यांनीच गाडी-चालवली होती. ती आईच्या आणि पपांच्या मध्ये बसली होती. मागे तिचं सामान, डिकीत आईचं आणि पपांचं सामान गच्च भरलं होतं. मिंकीला सोडून ते पुढं जाणार होते. पपांना दोनतीन महिने बंगलोरमध्ये काम होतं. मिंकीची शाळा जवळ आली, तशी आई म्हणाली, "मिंक्या राजा नीट राहा हं! आता इथं काही आजी नाही जवळ."

मिंकीला आईचं हसू आलं होतं. खरं तर मिंकीला इथं या होस्टेल-मध्ये ठेवावं हा आईचाच हट्ट होता. आजी तर अगदी विरुद्ध होती. पण आईचं सारखं एकच पालुपद. "आता आपण थकला. मिंकीही

मोठी झालीय. तिला जरा बाहेरच्या वातावरणात रुळू द्या. आपल्याला आता फार कष्ट होणार नाहीत, हे कळतंय मला."

आजीला आईचं बोलणं पटत नव्हतं. पण आजी खरंच फार थकली होती. अलीकडे ती नेहमी दमायची. म्हणायची, "नाही ग होत आता माझ्याच्यानं."

आणि आजीची ही खरी तक्रार ताईनं आईला पत्रानं कळवलेली होती. आईनं आल्या आल्या भराभरा खरं सांगून टाकलं होतं. ताईला घरचं वळण लागलं पाहिजे म्हणून तिचा हट्ट असतानाही तिला होस्टेलला पाठवलं नव्हतं. तिला घरीच राहायला लावलं होतं. घरी आजीच्या मदतीला नात्यातलीच एक बाई आणली होती. दादातर मागच्या वर्षीच दिल्लीला शिकायला गेला होता. प्रश्न होता मिंकीचा. आणि आईनं ठरवलं मिंकीला पुण्याला पाठवायची. ज्या शाळेत ती शिकत होती, राहिली होती तिथं. तिनं मिंकीला विचारलं होतं, "मिंकी राहाशील ना एकटी? का रडशील?"

मिंकीनं हसून विचारलं होतं, "मी काय ताई आहे होय ग रडायला? मला कुठंही पाठव. मी मुळीच रडणार नाही."

आणि खरंच ती घरून निघताना मुळीच रडली नव्हती. तिनं निघताना आजीला नमस्कार केला होता. आणि आजीच तिला पोटाशी धरून रडली होती. आजीला रडताना पाहूनही त्यावेळी मिंकी हसली होती. ताई चिडून म्हणाली होती, "कशी बेरड आहे पाहा. तिला काहीच कसं वाटत नाही ग आई?"

मिंकीच्या केसातून हात फिरवीत आई म्हणाली होती, "मोठी ब्रेव्ह आहे ती! रडूबाई नाही तुझ्यासारखी."

त्यावेळी तसं बोलणारी आई, मिंकीची शाळा जवळ आल्यावर मात्र कशी हळवी झाली होती. तिनं मिंकीची पापी घेतली होती. पपांनीही

मोठ्या बाई मिंकीकडे कौतुकानं पाहायच्या, मिंकी हळूच विचारायची, " जाऊ मी ? "

कधी कधी ती बाईंना सांगायची, " काही नाही हो बाई, मी सुनीलाची रिबन हरवली ना म्हणून बाईंनी मला सांगितलं रिबन मिळेपर्यंत कुणाशी बोलायचं नाही. "

" मग मिळाली का तिची रिबन ? "

" अं-हो. मिळाली ना ! शोधली मी. "

ती असं सांगायची खरी, पण खरी गोष्ट वेगळीच असायची. ती रिबन मुळी सुनीलाची नसायचीच- ती असायची मिंकीची, नाहीतर आणखी कुणाची तरी. सुनीलाच्या वेणीची ती रिबन मिंकी ओळखायची. तिला म्हणायची, " सुनीला ही रिबन माझी आहे, खरं ना ? कुठं मिळाली तुला ? हरवलीच होती ती. "

किंवा कधी विचारायची, " सुनीला ही रिबन माधुरीची आहे ग ! परवा किती शोधत होती बिचारी. देऊन टाकू चल तिची तिला. लोकांची वस्तू नकोच आपल्याला. "

मिंकीच्या या बोलण्यावर सुनीला एवढाला डोळा करायची. तिचा हात झटकून म्हणायची, " उगाच चोंबडेपणा करू नकोस. खोटारडी कुठली. माझीच आहे ही रिबन. परवा आणलीय मी नवी. "

मिंकीला सुनीलाचं मोठे नवल वाटायचं. खरं तर खोटं बोलत असायची ती. ही तिनं लावलेली रिबन कोणाची आहे हे नक्की तिला माहीत असायचं. आणि तरीही ती मिंकीला खोटारडी म्हणत असायची. अशा-वेळी मिंकीला मग फार राग यायचा, ती सुनीलावर रागवायची. तिची रिबन सोडीत म्हणायची, " खोटारडी आहेस तू ! आणि मला खोटी म्हणतेस. दे ती रिबन. माझी नसली तरी ती मला हवीय. मी माधुरीला परत देईन ती.

मिंकीनं असा रिबनला नुसता हात लावला तरी सुनीला मोठ्यानं ओरडायची, " बाई ही मिंकटली माझे केस ओढते. माझी रिबन घेते."

तिचं ओरडणं ऐकलं की ढंगाळेबाई धावतच यायच्या. मिंकीच्या हातातली रिबन हिसकून घ्यायच्या. तिला रागवायच्या. म्हणायच्या, " मिंके उगाच फाजीलपणा करू नकोस. तुला काय वाटतं ग, मोठ्या बाईंची आपण लाडकी आहोत तर वाटेल ते केलं तरी चालेलं ! माझ्याशी गाठ आहे लक्षात ठेव ! तुझी खोड एकदा चांगली जिरवतेच बघ. कशी वठणीला येत नाहीस ते पाहातेच मी.

ढंगाळेबाईंचा आवाजही ढगासारखाच होता. गडगड करणारा. बाई अशा आरडा ओरडा करायला लागल्या की सगळे होस्टेल गोळा होई. मग त्या सर्व मुलींच्या समोर बाई जास्तच आरडा ओरडा करीत. आणि वर म्हणत, " खबरदार यातलं एखादं अक्षर कुणी बाईंना सांगितलंत तर ! माझ्याशी गाठ आहे. या मिंकीची फार माया वाटत असेल; पण लक्षात ठेवा, मोठी लबाड, चोर मुलगी आहे ही. "

मिंकीला हा अपमान मात्र सहन होत नव्हता. ती जीव तोडून बोलायची, " बाई मी मुळीच चोरी केलेली नाही हं. या सुनीलानं लावलेली रिबन माझी आहे. ती घेत होते. "

पण बाई तिचं मुळीच ऐकून घ्यायला तयार नसायच्या. त्या सुनीलाचं खरं मानायच्या, " गरीब आहे बिचारी. तुझ्यासारखी वाह्यात नाही समजलीस. "

मिंकी मग गप्प बसायची. कधी नाही ते अशावेळी तिला आपण उगाचच इथं राहायला आलो याचं वाईट वाटायचं. आजीची आठवण यायची. तिनं काहीही केलेलं नसताना तिच्यावर ढंगाळेबाई चिडायच्या. आज तर त्यांनी तिला चोरटी म्हटलं होतं.

खरं म्हणजे मिंकी बाईंच्यासाठी कित्ती करायची. ती तिला सवयच

होती तशी. आजोबा-मित्रांची ती गम्मत करायची खरी; पण तीच त्यांचे कधी पाय चेपायची, कधी त्यांना वारा घालायची. त्यांच्यासाठी पटकन् सरबत करून द्यायची. ते आजोबामित्रही म्हणायचे, "ही मिंकी आमची थट्टा करते खरी, पण पोरीची माया मात्र फार आहे हं माझ्यावर.

तिला वाटायचं, या बाईंच्यावरसुद्धा आपण तशीच माया करावी. रागवतात म्हणून काय झालं? कधीतरी त्यांना कळेल, आपण कशा आहोत ते आणि मग त्या म्हणतील, "मिंकी खरंच चांगली मुलगी आहे."

बाईंनी, ढगेबाईंनी म्हणजेच ढंगाळेबाईंनी आपल्याला चांगलं म्हणावं, आपल्यावर रागवू नाही यासाठी मिंकी सारखी धडपड करीत असायची. परवाच सातवीतल्या एका मुलीचा नवाच परकर हरवला. धोबीण म्हणाली, "मी आणून ठेवला होता. कपडे मोजून नेले आणि इथं मोजून ठेवले. कायहो बाई, तुम्ही होता की समक्ष."

धोब्रिणीनं सर्वांच्यासमोरच बाईंना असं विचारलं. बाई त्यावेळी काही बोलल्या नाहीत. तिला म्हणाल्या." पाहाते, तपास करते."

आणि धोबीण गेल्यावर बाईंनी सर्वांच्यावर रागवायला सुरुवात केली. म्हणाल्या, "अलीकडे असं काही ना काही सारखं हरवत असतं. मला याचा नीट तपास लावलाच पाहिजे."

मिंकीलाही त्यावेळी तसंच वाटलं होतं. आपल्या होस्टेलमध्ये अशा चोऱ्या व्हाव्या हे खरं नाही. बाईंना त्यामुळे किती त्रास होतो. शिवाय आपल्याला सर्वांनाच कमीपणा. या असल्या चोऱ्या रात्रीच होत असतात. तिचीही एक छान मोटार हरवली होती. कुणीतरी चक्क तिच्या बॅगेचं कुलूप काढून नेली होती. तिला खूप वाईट वाटलं होतं. ती मोटार तिच्या पपांनी तिला न्यूयॉर्कहून आणली होती. रंग कसा निळानिळा होता. चालायला लागली की सारखा हॉर्न वाजल्याचा आवाज यायचा.

तिच्या चिंट्या-पिंट्या मैत्रिणींना तिनं एक दिवस खेळायला दिली. त्यांनी वर्गातही नेली होती आणि तिला चांगलं आठवत होतं, खेळून झाल्यावर त्यांनी तिच्याकडे ती मोटर आणूनही दिली होती. कितीतरी जणींनी तिला चिमटे घेऊन "दिली हं" अशी पावतीही घेतली होती. पण दोन-तीन दिवसांत ती हरवली होती. ढंगाळेबाई तिलाच ओरडल्या होत्या. म्हणाल्या, "तूच टाकली असशील वेंधळ्यासारखी कुठंतरी. बॅगेला कुलूप तसंच आहे म्हणतेस, मग कशी जाईल ग ती ? आपणच हरवायचं न् दुसऱ्यावर आळ घ्यायचा. अगदी वाईट खोड आहे बघ ही मिंकी तुझी.

त्यावेळी मिंकीला मोटार हरवल्यापेक्षाही बाईंच्या बोलण्याचं जास्त वाईट वाटलं होतं. तिनं पुष्कळ मुलींकडे चौकशी केली, पण कुणीच तिची मोटार पुन्हा पाहिलेली नव्हती. बेबीलाही तिनं विचारलं होतं, पण बेबीनं न बोलताच नुसते ओठच बाहेर काढून 'मला काय माहीत?' असं सुचवलं होतं.

आता बाईंचं तसंच झालं होतं. मिंकीसारखंच. त्यांनी सगळे कपडे मोजून घेतले होते, आणि नेमका परकर हरवला होता. नवाच. जरीच्या काठाचा. मागच्याच महिन्यात त्या मुलीचा वाढदिवस झाला होता म्हणून तिच्या आईनं शिवून पाठवलेला परकर हरवला म्हणून ती मुलगी खूप रडली. मिंकीला तिची दया आली. ती तिच्या जवळ जाऊन म्हणाली, 'रडू नकोस. अग रडून का परकर मिळणार आहे ? शोधायला हवा. आपल्याकडे नक्कीच कुणीतरी चोर आहे.'

'तर काय ग ! चांगले तुझ्या पपांनी बारके दिवे दिले होते तर कुणी त्यांच्या वायरच तोडल्या. मुद्दामच तोडल्या असणार त्या. आपली चोरी दिसू नाही म्हणून.' आठवीतली उषा म्हणाली.

मिंकीला ही मुलगीही थोडी आवडायची. ती उंच होती. काळीही

होती. पण मिंकीसारखी धीट होती. पावसात सगळे दिवे गेले तरी ती घाबरली नव्हती. बाई येईपर्यंत ती लहान मुलींच्या हॉलमध्ये बसली होती. हसवत होती. कितीतरी छोट्या मुली तिला बिलगल्या होत्या. त्यावेळी बाई तिच्यावर उगाचच रागावल्या होत्या. म्हणे तू आपली जागा सोडून आलीसच का ? कधी कधी बाई विचित्र वागतात असा मिंकीचा ठाम समज झालेला होता.

मात्र यावेळी त्या खरं तेच बोलल्या होत्या. चोरीचा तपास लावायलाच हवा होता. बाईंना मदत करायलाच हवी होती. मिंकी उषाला म्हणाली, " ए उषाताई, आपण दोघी मिळून या चोरीचा तपास लावू या ग ! बिच्याऱ्या बाई एकट्या तरी काय करणार ग ? "

आपल्या बोलण्यावर उषानं असं का हसावं ते काही मिंकीला कळलं नाही. ही उषा काही आपल्याला मदत करणार नाही एवढं मात्र तिला समजलं. मग ती एकटीच दोन-तीन दिवस सारखा तपास करीत होती. गपचूप गपचूप सगळीकडे पाहात होती. आणि एक दिवस तिला तो परकर सापडला होता. ती धावत धावतच ढगेबाईंच्या खोलीत गेली होती. हसत हसत बाईंना म्हणाली होती, " अय्या ! बाई तो परकर बघा मला कुठं सापडला. सगळे रद्दी कागद, कपडे ठेवता ना तुम्ही, त्यात होता. "

तिला वाटलं होतं बाई म्हणतील, " शाब्बास ! बरं झालं हं तू शोधून काढलास ते. असंच काम करावं. "

पण झालं उलटंच. तिच्या हातून तो परकर घेत त्या तिच्यावर खेकसल्या. म्हणाल्या, " तुला कुणी हा नसता कारभार करायला सांगितला होता ? खबरदार पुन्हा त्या कोठीत गेलीस तर. तुम्ही मुली असं वागायला लागलात तर माझी मोठी पंचाईत होऊन बसेल. किती महत्वाचे कागदपत्रं आहेत तिथं. "

" पण बाई, ती रद्दीची खोली होती. मी-मी सहज गेले होते. म्हटलं पाहावं कुणी चुकून त्या रद्दी कपड्यात परकर नेऊन टाकलाय् का ? तर नेमकाच दिसला. खूप खाली होता. कुणाला दिसू नाही असा. पण मला सापडला. बरं झालं नाही का ? "

बाईंनी तिच्याकडे पाहिलं होतं. बाप रे ! असल्या डोळ्यांनी आत्ता-पर्यंत तिच्याकडे कुणीच पाहिलेलं नव्हतं. मिंकी मुळीच भिली नव्हती. पण बाईंच्या या डोळ्यांना ती घाबरलीच. काही न बोलता तो परकर तिथंच टाकून पळाली.

दोनचार दिवसांनी उषा तिला म्हणाली, " मिंके तुला समजलं का ग ? "

" काय ? "

" आपल्या होस्टेलमध्ये म्हणे भूत शिरलंय. म्हणूनच हे सगळं होतंय. परवा बाईच सांगत होत्या. अकरावीतल्या मुलींना. "

" भूत ? बाई सांगत होत्या ? बाईंनी पाहिलंय ? कसं असतं ग ? "

" कुणास ठाऊक कसं असतं ते ! पण आता अकरावीतल्या मुली चांगल्याच घाबरल्या आहेत. त्यांना रात्रीचा अभ्यास करायचा असतो ना ? "

" आता ग ? या चिंट्या-पिंट्या काय करतील ग भूत दिसलं तर ? एकदा आपल्याला दिसलं पाहिजे नाही ग ? "

" नको ग बाई ! मीच फार घाबरलेय. बाईपण खूपच घाबरल्या आहेत हं. म्हणतात आपल्याला बाई फार भीती वाटते भुताची. भूतच ते. काय करील आणि काय नाही. "

मिंकीला भूत हा विषयच नवा होता. तिच्या आजीला खूप गोष्टी यायच्या. पण त्यात भूत नसायचं. राजा-राणी, प्रधान, जादू वगैरेंच्या गोष्टी असत. आजी म्हणायची, " कसलं भूत आणि कसलं काय. माणसंच भुतासारखी वागतात आणि म्हणतात भूत आहे. असल्या

गोष्टींवर कधी विश्वास ठेवू नाही."

पण आता त्याच्यावर विश्वास ठेवणं मिंकीला भाग होतं. कारण रोज एक नवी बातमी ऐकायला येत होती. कुणाला भूत पळताना दिसलं होते. कुणी त्याला जिन्यात बसलेलं पाहिलं होतं. एकदा रात्री तर अकरावीतली एक मुलगी ओरडत उठली. तिचा गळा धरला होता म्हणे भुतानं. तिला चांगली दिसली होती त्या भुताची बोटं. शेवग्याच्या शेंगाएवढाली लांब होती.

एक ना दोन ! हजार गोष्टी मुलींना दिसत होत्या. मिंकी मात्र मनाशी चुटपुटत होती. तिला एकदाही भुतानं दर्शन दिलं नव्हतं. सुनीलाला तिनं विचारलं होतं, "तुला दिसलं होतं का ग भूत कधी ? दिसलं तर मला सांग हं."

न दिसलेल्या भुताला थरथर कापतच सुनीला म्हणाली, "नको ग बाई ! मला दिसलं तर मी मरूनच जाईन."

बिचारी सुनीला. खरंच ती फार भित्री आहे. नकोच दिसायला तिला ते भूत. मिंकीला मात्र ते दिसायला हवं होतं. चारमाही परीक्षेचा अभ्यास करता करता सुद्धा मिंकी भुताचाच विचार करायची.

सगळ्या होस्टेलवरच भुताची सावली पडली होती. होस्टेलवर राहाणाऱ्या मुलींकडून वर्गातल्या मुलींना बातम्या समजत होत्या. त्यांचे डोळे भीतीनं गपकन् मिटत होते. त्या भीतीच्या बरोबरीनं एक वेगळीच उत्सुकताही त्यांच्या मनात भरलेली होती. कुणीही कुठंही भेटलं तरी विचारीत होतं, "मग आज काय झालं ग ? भूत आलं होतं का ?"

आणि मग सांगायलाही खूप गोष्टी असत. शाळेच्या मधल्या सुट्ट्या खमंग होत होत्या. मुली टिकरी खेळणं विसरल्या होत्या. लपंडाव विसरल्या होत्या. त्यांना एकच विषय पुरला होता. भुताचा.

# तीन

त्या दिवशी खूपच पाऊस पडत होता. आजीच्या भाषेत मिंकी म्हणत होती, ‘ केवढा मुसळधार पाऊस हा ! ’ पण मुसळ म्हणजे काय हेच कुणाला कळत नव्हतं. सुनीला म्हणाली होती, “ ही मिंकी उगाचच काहीतरी बडबडत असते. अशा पावसाला मुसळधार नाही काही म्हणत. याला म्हणतात हेवी रेन ! ”

“ हेवी रेन म्हणजेच मुसळधार पाऊस. मुसळ खूप जड आणि जाड असतं त्याच्यासारख्या धारा पडताहेत ना म्हणून हा मुसळधार पाऊस. आमच्या आजीला सगळं माहीत आहे. ”

मिंकीनं आजीचा विषय काढला की सुनीला गप्प होत होती. सगळं ऐकून घेत होती. मिंकीच्या आजीला सुनीला भारी भीत होती. त्याला कारणही तसंच झालं होतं. मध्यंतरी मिंकीला थोडा ताप आला होता. हवा बदललेली, त्यात मिंकी पोहायला जात होती. तिनं नाव दिलं होतं पोहण्याच्या वर्गात, सुनीलालाही द्यावसं वाटत होत; पण तिच्या पत्राला लौकर उत्तरच आलं नव्हतं. ती मिंकीला म्हणाली होती, ‘ तुझं आपलं बरं आहे. विचारलं की परवानगी मिळते. ’

सुनीलाचं हे बोलणं अगदी खरं होतं, त्यावर काहीही उत्तर द्यायची गरज नव्हती. मिंकीनं ते दिलंही नव्हतं. पण त्या दिवसापासून सुनीला मात्र मिंकीला गर्विष्ठ म्हणत होती. तिच्याशी कट्टी घेऊन बसली होती.

पाऊस दिवसभर पडत होता. शाळेत आणि वसतीगृहाच्या मधल्या आवारात खूपच पाणी साचलं होतं. त्या पाण्यात खेळावं असं मिंकीला फार फार वाटत होतं. पण सगळ्या मुली पावसाच्या त्या गडगडाटानं भेदरून आतच बसल्या होत्या. सुनीला उगाचच वाद घालीत होती.

मिंकीला वाटत होतं, ' मुसळधार पाऊस ' काय आणि ' हेवी रेन ' काय सगळ्या शब्दांचे अर्थ एकच. जे काय बोलायचं ते दुसऱ्याला समजलं म्हणजे झालं. पण आपण आजीचं नाव घेतलं की, सुनीला अशीच उगाचच फुरगटून बसते. धड खेळत नाही की, बोलत नाही. हुप्प बसून राहाते.

सुनीलाकडे पाहाता पाहाता मिंकी स्वतःशीच विचार करीत होती. खरं तर सुनीलानं आजीवर रागवावं, आजीला एवढं भ्यावं असं काही-सुद्धा झालेलं नव्हतं. मिंकाला ताप आला होता म्हणून आजी पाहायला आली होती. मिंकीला भेटल्याशिवाय तिनं हे दोन-अडीच महिने काढले होते, हीच खरं म्हणजे नवलाची गोष्ट होती. पण आई-पपा येत होते; त्यामुळेच आजी घरी राहिली होती. आता आई-पपा पुन्हा जर्मनीला गेले होते. ते गेले आणि आठ दिवसांतच मिंकीला ताप आला होता.

ताप आला की मिंकीला आजीच्या हातचा गुरगुट्या भात हवासा वाटायचा. एक दिवस तापात तिने सहजच आजीला पत्र लिहिलं आणि आजी सकाळी अकरा वाजताच होस्टेलच्या दारात येऊन उभी राहिली. बाईंची परवानगी काढून ती सरळ मिंकीच्या कॉटपाशी आली न् तिनं तिच्या गोल भांड्यासारख्या थर्मासमधून मुद्दाम मिंकीसाठी आणलेला गुरगुट्या भात तिला भरवायला सुरुवात केली.

नऊ वर्षांची असली म्हणून काय झालं ? असं कधीकधी आजी तिला भरवायची. खरं म्हणजे त्यावेळी सुनीलानं हसायला नको होतं. आजीनं तिलाही विचारलं होतं, ' बाळ तुला हवा का मेतकूट भात ? खा ग ! हे लिंबाचं लोणचं हवं तर घे. '

" शी ! मला नाही आवडत तो शेणासारखा भात ! "

सुनीलानं भाताला शेणाची उपमा दिली होती. सुनीला असं बोलली. आता आजी किती रागावली असणार हे मिंकीला समजलं होतं. आजी

आता सुनीलाला रागवून बोलेलही. मिंकीला वाटलं, आपण आजीचं लक्ष दुसरीकडे वेधावं. म्हणून ती आजीला म्हणाली, "आजी हा भात तू घरून निघताना करून घेतलास? एवढ्या पहाटे?"

"हो ग माझे सोनसळे. तुला ताप आलाय नं! तापात तुला असा गुरगुट्टया भात आवडतो. माहीत का नाही मला?"

असं म्हणूनच आजी थांबली नाही, तिनं मिंकीच्या तोंडावरून हात फिरवला. आपल्या पदरानं तिचं तोंड पुसलं आणि तिला घास भरवला. आजीनं आपल्याला घास भरवला. आजी सुनीलावरचा राग विसरली याचा मिंकीला आनंद झाला. तिनं मोठ्या चवीनं घास घेतला आणि सुनीला फसकन् हसली.

आणि काय होतंय ते कळायच्या आधीच आजीनं सुनीलाच्या पाठीत एक धपाटा घातला. आणि आजी सुनीलावर कडाडली, 'कार्टे, मला हसतेस? तुझ्या घरात कुणी मोठी माणसं आहेत का नाहीत?'

आजी आणखीही बोलली असती पण सुनीला तिथून धूम पळाली होती. दिवसभर मिंकीजवळ राहून आजी संध्याकाळच्या गाडीनं घरी गेली होती. आजीनं सुनीलाला मारायला नको होतं असं मिंकीलाही वाटलं होतं. पण ती तरी काय करणार? सुनीला अशी हसेल असं मिंकीला मुळीच वाटलं नव्हतं.

आजी दिवसभर होती. मिंकीला वाटत होतं, बहुतेक ढंगाळेबाई येणार आणि आजीला बोलणार. पण तसं काहीच झालं नव्हतं. उलट आजी गेली तेव्हा बाई मुद्दाम तिला रिक्षापर्यंत पोचवायला गेल्या होत्या. मिंकीसमोरच आजीला म्हणाल्या होत्या, 'अशा मधून मधून आलात तरी हरकत नाही. येत जा.'

बाईंचं बोलणं ऐकून मिंकीला फार बरं वाटलं होतं. आपली आजी खरंच किती चांगली आहे! कशी सर्वांना आवडते ती.

आजी गेली न् संध्याकाळी मग मिंकीला अगदीच करमेनासं झालं. सुनीला आपल्या कॉटवर बसून पुस्तक वाचीत होती. मिंकी सुनीलाला म्हणाली, " सुनीला आपण सापशिडी खेळू या ग ! मला बघ अगदीच करमत नाही."

" करमत नाही तर मला काय उपकार सांगतेस ! माझ्याशी मुळीच बोलू नकोस. तुझी आजी अगदी वाईट आहे. मला मारलंन तिनं."

मिंकीनं सुनीलाला किती पटवून द्यायचा प्रयत्न केला, पण ती मुळी ऐकायलाच तयार नव्हती. ती मिंकीवर रागावली होती. तिच्याशी फारशी बोलत नव्हती. दुसऱ्या मुलींना म्हणत होती, " हिच्या आजीची मला फार भीती वाटते. अगदी मारकुट्टी आहे."

आपली आजी कशी आहे, हे मिंकीला माहीत होतं. पण या सुनीलाला ते कळत नव्हतं. कोणतीही गोष्ट कितीवेळा सांगितली तरी सुनीलाला समजत नव्हती. एकदा सातवीतली रावी तिला म्हणाली होती, ' अग ही सुनीला खरं तर यंदा सहावीत हवी होती. दोनदा नापास झालीय. ढच आहे अगदी.'

पण मिंकीला तसं वाटत नव्हतं. तशी एरवी सुनीला खूप हुषार होती. बोलायची तर कशी फटफट ! पेरुवालीशी असा सौदा करायची की बघतच राहावं. ढंगाळेबाईंना कितीतरी कामात मदत करायची. मुलींचे कपडे मोजायची. पुष्कळ कामं तिला येत होती. खरंच ती मिंकीला आवडत होती. ती आवडत होती, बेबी आवडत होती, कुणीतरी म्हणालं होतं, ' बेबीची आई तिला टाकून गेलीय. खूप लांब.'

यावर मिंकीनं म्हटलं होतं, ' मग काय झालं ? म्हणजे तिला आई आहे. मग तुम्ही असं का म्हणता तिला आई नाही म्हणून ?'

" अग तशी नाहीच तिला आई. तिची आई तिच्याजवळ कुठं राहाते ? तिला टाकून गेलीय नाही का ?"

“ अग पण माझी आई नाही का टाकून गेलीय मला ? ती तर जर्मनीला गेलीय. कितीतरी लांब. ”

“ तसं नाही ग ! तिनं बेबीला एकटीलाच लहानपणी टाकून दिलंय. बेबीला तसं कुठं कोण आहे ? एका श्रीमंत माणसानं फक्त सांभाळलंय तिला. अग तोच आला होता तिला इथं सोडायला.”

असलं काही एकलं की मिंकीचे टपोरे डोळे बारीकबारीक व्हायचे. या असल्या गोष्टींचा तिला अर्थच कळत नव्हता. तिला एवढंच कळत होतं, या साऱ्या मुली आहेत. आपल्यासारख्याच. त्यांनीही आपल्या-सारखंच खूप खेळावं, हसावं, अभ्यास करावा. रडू मात्र नाही.

त्या दिवशी खूपच पाऊस पडत होता. मिंकी घरी असती तर या पावसात चिक्कार हुंदडली असती. वेळी आजीचा फटकाही तिनं खाल्ला असता. पण सुनीलासारखी अशी रुसून बसली नसती. मारलं तरी आजीची माया वेगळीच असते. सुनीलाला आजीच नाही. बिच्चारी ! मिंकीला सुनीलाची दया आली. ती रुसली, रागावली, तरी आपण राग-वायचं नाही; तिच्याशी बोलायचंच असं तिनं मनाशी ठरवून टाकलं.

बाहेर कसा छान पाऊस पडत होता. धो ! धो ! मध्येच कडकड् वीज चमकत होती. समोरच्या शाळेच्या इमारतीच्या पन्हाळीतलं पाणी एखाद्या मोठ्या पाणलोटासारखं खाली पडत होतं. ते पाणी सुद्धा कसं पांढरं स्वच्छ दिसत होतं. वाटत होतं त्या पन्हाळीखाली हात धरावा, जड जड पाणी हातावर झेललं की कसं वेगळंच वाटतं. आपोआप आपला हात हालत राहातो. समुद्राच्या लाटेत उभं राहिलं की कसं वाटतं तसं ! चिंचेच्या झाडाखाली शाळेचा टॉमी कुत्रा बसला होता. मस्त मजेत ! तिथं फारसं पाणी पडत नसावं. पण तशा बारीक बारीक धारा नक्कीच अंगावर येत असतील. मजा वाटत असेल टॉमीला. खरं तर आता असं या हॉलमध्ये बसून राहाण्यात कसली मजा वाटत असेल सुनीलाला ?

कितीतरी मुली खिडकीत उभ्या होत्या. पावसाची मजा पाहात. कुणी कुणी खाली व्हराड्यातही जाऊन बसल्या होत्या. मिंकीला वाटत होतं, निदान आपण तसं खाली तरी जाऊन बसावं. जवळून तरी पाऊस पाहावा. शाळेच्या आवारातून कसे पाटच्या पाट खळाळत होते. तिला एकदम मोटरलाँचची आठवण झाली. तिनं भराभरा आपली खेळण्याची बॅग उघडली. सुनीला पुस्तक वाचण्याचं सोंग करीत तिच्या बॅगेकडे पाहात होती. मिंकीच्या ते ध्यानी आलं होतं. मग मिंकीनंही आपलं एकेक एकेक खेळणं बाहेर काढलं. स्वतःशीच बोलल्यासारखी ती बोलली, ' या बाहुलीची एकदा वेणी घातली पाहिजे बाई ! आणि माझी ती मोटरलाँच कुठं गेली. कशी पाण्यात सटसट चालते. लाललाल दिवा लावीत पुढं पुढं जाते. '

बेबी आपल्या कॉटवरून टुणकन् उडी मारून मिंकीजवळ आली. मिंकीला म्हणाली, " मी घालू का तुझ्या या बाहुलीची वेणी ? दे तुझा तो बाहुलीचा ब्रश. "

" देते ग ! पण तू खाली येतेस ? या बाहुलीचा हात तूच धर. पण हळू हळू चालव बरं का ! "

मिंकीची ही मात्रा बरोबर लागू पडली. सुनीलाला मिंकीची बाहुली फार आवडायची. तिला हातात घेऊन चालावयाची तर सुनीलाला मोठी हौस. मिंकीनं आपली बाहुली बेबीच्या हातात दिलेली पाहाताच तिनं हातातलं पुस्तक खाली टाकलं. ती बेबीला म्हणाली, " बेबी, उगाच लोकांच्या गोष्टीला हात लावू नयेत. मोडली मग ती बाहुली ? "

" नाही मोडत ग. बेबी सावकाश चालव हं ! "

" अग–अग–तशी नको धरूस. अशी धर ! नीट. " असं म्हणत सुनीलानं बेबीच्या हातातली बाहुली घेतली न् तिला तिनं एक पाऊल टाकायलाही लावलं. मिंकीनं विचारलं, " सुनीला तू येतेस खाली ?

आपण माझी मोटरलाँच चालवू या."

"आणि बाहुली? ती परत ठेवणार आहेस?"

"नाही. तिलाही घेऊन जाऊ की पाऊस दाखवायला. बेबी ही मोटरलाँच पण घे. ती बघ कशी पाण्यावर तरंगते. रबराची आहे ना. तुला मजा वाटेल बघ."

मिंकीची कळी एकदम खुलली होती. बेबी, सुनीला दोघीही तिच्याबरोबर निघाल्या होत्या. आता मजा येणार होती. मिंकी त्या दोघींच्या आधीच जिना उतरली. खरं म्हणजे तिला कठड्यावरून सर्रकन खाली जायचं होतं. पण शाळेत एकदा ती तशी उतरत असताना मोठ्या बाईंनी पाहिलं होतं आणि बजावलं होतं, 'असं पुन्हा उतरायचं नाही.'

त्यावेळी तिनं बाईंना 'पुन्हा उतरणार नाही' असं कबूल केलं होतं. म्हणूनच सर्रकन् खाली जायचा मोह तिनं आता आवरला होता. ती पटपट उतरली होती. पाऊस आता मघा इतक्या जोरात पडत नव्हता याचं तिला थोडं वाईट वाटलं. तरी पण पाणी पुष्कळच साचलं होतं. मिंकी पायऱ्या उतरून चक्क अंगणात आली. तिच्या ढोपराखाली पाणी होतं. मिंकीला मजा वाटली. पचक् पचक् करीत तिनं पाण्यात चालून पाहिलं, पायानं पाणी उडवलं. तिच्या त्या खेळाकडे पाहून आणखीही दोघी-चौघी पाण्यात उतरल्या. कुणीतरी म्हणाली, "आज ढंगाळेबाई बहुतेक दारंखिडक्या लावून बसल्या असतील. पावसात कसल्या येतात त्या इकडं."

मिंकीनं ते ऐकलं न् पाण्यातच उडी मारली. केवढं तरी वरपर्यंत पाणी उडालं. मिंकी केसापासून भिजली. वरून पाऊस पडतच होता. कितीतरी दिवसांत असं मनसोक्त पाण्यात आणि तेही पावसाच्या पाण्यात खेळायला मिळालं नव्हतं. मिंकीनं आपल्या हातातल्या मोटरलाँचला किल्ली दिली न् ती पाण्यात सोडली. सर्रसर्र करीत. लाललाल दिवा



पाजळवीत तिची मोटरलॉंच निघाली होती. चिंचेच्या झाडाकडे. कारण पाण्याला त्याच बाजूला उतार होता.

मोटरलॉंचचा आवाज ऐकून पारावरचा टॉमी उठून उभा राहिला. मोटरलॉंचच्या मागोमाग मिंकीही पाराकडे निघाली होती. मिंकीची आणि टॉमीची चांगलीच ओळख होती. आणि तरीही टॉमी मिंकीवर

गुरगुरला. त्यानं शेपटी ताठ केली आणि तो त्या मोटरलाँचकडे पाहून भुंकायला लागला. मिंकी आपल्याच नादात होती. ती पळत पळत मोटरलाँच जवळ गेली, तिनं ती पकडली आणि पारावर टॉमीच्या समोर ठेवली. पाण्याबाहेर काढल्यावर लाँचचा आवाज बंद झाला होता. मिंकीनं तिच्यातलं पाणी झटकलं आणि तीही पारावर चढून उभी राहिली. आता टॉमीनं शेपूट खाली केली न् तो मिंकीजवळ आला. मिंकीनं त्याला लाँच होती त्याच हातानं थोपटलं. आणि ती उगाचच इकडे तिकडे पाहात उभी राहिली. एकदम वाऱ्याचा झोत आला आणि झाडा-वरचं पाणी सरसर करीत मिंकीच्या अंगावर पडलं. मिंकीनं सहजच वर पाहिलं आणि ती दचकली. या एवढ्या पावसात कोण बरं बसलंय ? तिनं पुन्हा एकदा नीट मान वर करून पाहिलं. घटकेपूर्वी तिला जिथं कुणीतरी बसलेलं अगदी स्पष्ट दिसलं होतं, तिथं आता कुणीच नव्हतं. मिंकीनं पुनःपुन्हा वर पाहिलं पण आता हिरव्याकच्च फांद्यांखेरीज तिथं काहीच नव्हतं. क्षणभर मिंकी गोंधळली. हा काय प्रकार आहे तिला कळेना. ती अशी पाहात उभी असतानाच लख्खकन् वीज चमकली. मिंकीनं पुन्हा वर पाहिलं, आणि क्षणात तिला तिथं काहीतरी पांढरं पांढरं चकाकताना दिसलं. अगदी मघासारखंच.

मिंकी अशी काहीशी भांबावून पारावर उभी होती. टॉमीनं एकदां फडफड अंग झटकलं, कान ताठ केले आणि तो उडी मारून मागच्या बाजूला पळून गेला, मिंकीनं सहज टॉमी गेला त्या बाजूला पाहिलं, तिला तिकडेही कुणीतरी उभं असावं असं वाटलं. अगदी वर दिसलं होतं तसंच. मिंकीनं एकदा वर आणि एकदा मागच्या बाजूला दृष्टी टाकली. सावध चित्तानं. आता तिथं काहीच नव्हतं. टॉमी जाऊन ज्ञानू माळयाच्या दारात उभा राहिला होता. अंग झटकीत होता. आणि उगाचच मान वर करून भुंकत होता.

आपण जे पाहिलं तो भास होता की खरं होतं हेच मिंकीला कळेनासं झालं होतं. मिंकी अशी उभी असतानाच पाराच्या बाजूनं सुनीला येत होती. तिच्या कडेवर मिंकीची बाहुली होती. आणि त्या बाहुलीचे केस चंक्क पावसात भिजत होते. बाहुलीच्या त्या ओल्या केसांकडे पाहाताना मिंकीला पुन्हा वर दिसलेल्या त्या कुणाची तरी आठवण झाली. त्याच्या दाढीचे केस असेच चकाकत होते.

सुनीला जवळ आल्यावर मिंकीनं तिला विचारले, "सुनीला वर बघ ग. तुला कोण दिसतंय का सांग!"

सुनीलानं वर पाहिलं. ती म्हणाली, "नाही बाई, मला तर वर कुणीच दिसत नाही. का ग?"

"अग आत्ता एवढ्यात मी वर एक पांढरा पांढरा माणूस पाहिला. त्याची दाढीही अशीच या बाहुलीच्या केसासारखी चकाकत होती. आणि टॉमी झानूच्या घराकडे पळाला ना, तर तोही मला त्या बाजूला दिसला. पण तेव्हा मला त्याची दाढी दिसली नाही. पण खूप मोठी पाठ दिसली. पांढरी पांढरी."

मिंकी बोलत असताना सुनीला वर खाली, खालीवर अशी सारखी पाहात होती. मग ती थरथरत राहिली. हातातली बाहुली तिनं तिथंच त्या ओल्यात टाकली न् ती धूम पळत सुटली. "भूतऽऽभूत. मिंकीला भूत दिसलं. भूत!"

सुनीला ओरडत धावत होती. पाण्यातून तिला नीटसं धावताही येत नव्हतं. ती दोनदा पडलीही. धावणाऱ्या सुनीलाकडे पाहाता पाहाता मिंकीच्या डोक्यात प्रकाश पडला. म्हणजे आज तिनं भूत पाहिलं होतं तर! असं असतं भूत? नुसताच पांढरा गोळा? आणि चकाकणारी दाढी? मिंकीला अगदी चुटपूट लागली. ते भूत आहे असं जर आपल्याला कळलं असतं तर आपण नीट तरी पाहिलं असतं त्याला. छे!

चांगला चान्स आला न् तो आपण फुकट घालवला. भुताला नीट न्याहाळून पाहिलेसुद्धा नाही.

सुनीला कशीबशी व्हरांड्यात शिरली आणि तिनं सर्व मुलींना मिंकीला भूत दिसल्याचं सांगितलं. सुनीलानं असं सांगितलं मात्र, साऱ्या ओरडत ओरडत किंचाळत वर पळाल्या. मुलींच्यात एकच गोंगाट उडाला. पारावर उभी होती एकटी मिंकीच.

मिंकीला भुताचा आणि त्याहीपेक्षा सुनीलाचा फार राग आला. पावसाची सारी गंमत त्या दोघांनी वाया घालवली होती. आता काय, सगळ्याच वर गेल्या होत्या. पाऊसही थांबत आला होता. पाण्याचा जोरही ओसरला होता. सगळीच गंमत संपली होती. मोटरलॅांचच्या कितीतरी गमतीजमती तिला करायच्या होत्या. मुलींना दाखवायच्या होत्या. मिंकी पारावरून खाली उतरली. उतरण्यापूर्वी तिनं वर पाहिलं. वीज चमकली आणि तिला त्या झाडावर पुन्हा ते भूत दिसलं. आता ते थोडं वेगळंच वाटलं. हे भूत असा आकार कसं बदलतं घटके घटकेला ? मिंकीला प्रश्न पडला. तिला वाटलं मोठ्यानं ओरडून त्या भुताला काही-तरी विचारावं. तिनं क्षणभर वर पाहिलंही. पण आता तिथं पुन्हा काहीच नव्हतं.

आता मात्र मिंकीच्या मनात कधी नाही ती भीती निर्माण झाली. तिनं भराभर भराभर व्हरांडा गाठला. व्हरांड्यात ओलंच ओलं झालं होतं. मुलींचे एकातएक गुंतलेले पाय उमटले होते. त्या पायांच्याकडे पाहाता पाहाता मिंकीला एक खूपच मोठा पाय दिसला. एकदा रात्री म्हणाली होती, " भुताचे पाय उलटे असतात. हा मोठा पायही अगदी उलटा होता. मिंकीनं खाली वाकून तो पाय पाहिला. त्या पायावर आपला पाय ठेवून पाहिला. तो पाय मिंकीच्या पायापेक्षा तिप्पट तरी मोठा होता. आणि चक्क उलटा होता. म्हणजे मिंकीची जिथं टाच होती, तिथं त्याची बोटं

उमटलेली होती.

आपली बाहुली हातात घट्ट धरून ती हळूहळू चालत होती.आणखी कुठं तसा पाय दिसतो का पाहात होती. पण वर जिना संपेपर्यंत तिला तो पाय दिसला नव्हता. मात्र तिनं वरच्या पायरीवर पाय ठेवला मात्र, शेजारच्या हॉलमध्ये जाणाऱ्या दरवाज्यापाशीच तो पाय उमटला होता. बाप रे! म्हणजे भूत भयंकरच असतं. त्याच्या एका पावलात ते आख्खा जिना चढू शकतं. केवढाला एकेक पाय असेल त्याचा? म्हणजे त्या चिंचेच्या पारावर उभं राहिलं तर भुताचं डोकं चिंचेच्या झाडाच्या वर दिसेल. आणि आता ते त्या हॉलमध्ये शिरलंय, तिथून हात लांब केला की त्याचा हात सहजच आपल्या हॉलमध्ये पोचेल. काय हवं ते घेईल की ते उचलून!

आणि मग मिंकीला एकदम आठवलं. मागच्याच आठवड्यात एका मुलीचे चार फ्रॉक्स एकदम हरवले होते. एकदा एका मुलीचा खाऊचा डबा गेला होता. ज्या हॉलमध्ये आता भूत शिरलंय त्या हॉलमध्ये तर नेहमीच काहीतरी हरवत होतं. कुणाचं घड्याळ, कुणाची साखळी, कुणाची चपल, कुणाचे रुमाल. सारख्या तक्रारी यायच्या. ढंगाळेबाई चिडायच्या. मोठ्याबाई रोज उपदेश करायच्या. म्हणायच्या, "कुणी या वस्तू घेतल्या असतील तिनं माझ्याजवळ आणून द्याव्या. मी तिचं नाव फोडणार नाही. तिला शिक्षाही करणार नाही. पण अशी सवय वाईट. देवाला चोरी आवडत नाही. वेळीच शहाणं व्हावं. नाहीतर देवच फार मोठी शिक्षा करील."

मोठ्याबाई असं बोलल्या की मिंकीला वाटे, आता कुणीतरी चटकन् पुढे येईल. सगळ्या वस्तू भराभर गोळा होतील. जिची तिला वस्तू मिळेल. आणि सगळ्यांनाच आनंद होईल. ढंगाळेबाईही मग अशा सारख्या चिडायच्या नाहीत.

पण तसं होत नव्हतं. मिंकीला मग फार वाईट वाटायचं. आपल्या मोठ्याबाई इतक्या चांगल्या असताना या मुली असं का करतात हेच तिला कळत नव्हतं. पण आता तिला सर्व गोष्टींचा उलगडा झाला होता. ही सर्व करामत त्या भुताची होती. बिचाऱ्या मुली तरी काय करणार होत्या ? ते भूत आपल्या मोठ्याबाईंना थोडंच जुमानणार होतं ? एवढं मोठं; भयंकर भूत ! ते अशा बारीक सारीक गोष्टी घेऊन काय करत असेल ? की त्याच्या घरीही कुणी लहान लहान मुली असतील ? कोण कोण असेल बरं त्याच्या घरी ? भुताचं घर असेल तरी कसं ?

त्या पायाकडे पाहात उभी असलेली मिंकी अशाच कितीतरी गोष्टींचा विचार करीत होती. हॉलमध्ये गोंगाट चालला होता. कुणीतरी तिचं नाव घेतलं म्हणून ती आपल्या हॉलऐवजी त्या हॉलमध्ये शिरली. तिला पाहाताच रावी पुढे धावली. मिंकीला मिठी मारून म्हणाली, " मला वाटलं पकडलं तुला भुतानं ? "

" मला कसलं पकडतंय ग ते. पण ते इथंच शिरलंय. या हॉलमध्ये. मी त्याचे पाय पाहिले दारात. "

मिंकी एवढं बोलली मात्र. हॉलमधल्या सगळ्याच मुली एकदम किंचाळल्या.

# चार

एक–दोन–तीन–चार–मिंकी लक्ष देऊन ठोके मोजीत होती. अंधारात तिनं अगदी टक्क डोळे उघडे ठेवले होते. वरच्या छताकडे ती नीट पाहात होती, आणि न चुकता घड्याळाचे ठोके मोजीत होती. बरोब्बर बारा वाजले होते. मिंकीनं एकसुद्धा ठोका मागेपुढे चुकवला नव्हता. नक्कीच बारा वाजले होते. हे बारा वाजायचीच मिंकी वाट पाहात होती, गेले दोनतीन दिवस ती या बारा वाजण्याची वाट पाहात होती; पण ते बारा वाजतच नव्हते. कधी अकराच वाजायचे तर कधी एकदम चार नाहीतर पाच वाजायचे. हे असं कसं होतं याचं मिंकीला नवल वाटायचं. खरं तर ती किती प्रयत्न करायची बाराचे टोले ऐकू यावे म्हणून. पण काय व्हायचं तेच तिला कळत नव्हतं. धडपड धडपड करून ती अकराचे टोले ऐकत रहायची. चांगले जागेपणी. आणि मग मध्येच काहीतरी घोटाळा व्हायचा. आपोआपच. अकरानंतर तिला एकदम टोले ऐकू यायचे ते चाराचे किंवा पाचाचेच. मग ती स्वतःवरच चिडायची. असं काय आपल्याला होतं? हे बाराचे टोले कुठे लुप्त होतात? का घड्याळात ते पडतच नाहीत? भुतानं इथंही काही जादू-टोणा केलाय का काय? तसं असेल तर मात्र मोठीच पंचाईत होती. बाराचे ठोके तर तिला ऐकायलाच हवे होते. कारण मध्यरात्री बारा वाजताच भूत फिरायला लागतं असं परवा तिनं एका पुस्तकात वाचलं होतं. आणि त्या दिवसापासून ती हे बाराचे ठोके ऐकण्यासाठी धडपडत होती.

खरं म्हणजे हे असं भूताखेताचं पुस्तक पूर्वी तिनं कधीच वाचलं नसतं. तिची आजी नेहमी तिला सांगायची, " मिंके नेहमी चांगलं

वाचावं. देवांच्या गोष्टी वाचाव्या. इतिहास वाचावा. भूगोल समजावून घ्यावा. चांगली पुस्तकं वाचली की माणूस चांगलं होतं."

"म्हणजे तुझ्यासारखं! खरं ना?"

मिंकी आजीला मिठी मारून म्हणायची. मिंकीलाच नाही तर मिंकीच्या आईलाही आजीचा अभिमान वाटत होता. मिंकीची आई आपल्या मैत्रिणींना नेहमी आजीच्या गोष्टी सांगायची आणि म्हणायची,

"आमच्या सासूबाई, त्यावेळच्या मॅट्रिक आहेत. फार हुषार आहेत. विचारही फार चांगले आहेत त्यांचे. मुलांना चांगलं वळण लावतात त्या. म्हणून तर मी निर्धास्त आहे."

आपल्या आईचं हे असलं बोलणं मिंकीनं कितीतरी वेळा ऐकलेलं होतं. तिलाही आजीची सारी शिस्त माहीत होती. आणि म्हणूनच ती कधीही, कुठलीही आजीला न आवडणारी पुस्तकं वाचत नव्हती.

परंतु अलीकडे तिला त्या भुताचच वेड लागलं होतं जसं काही. कसंही करून त्या भुताचा तिला शोध लावायचा होता. त्या भुतानं अलीकडे तिच्या होस्टेलमध्ये नुसता धुमाकूळ घातला होता. साऱ्या मुली अगदी हैराण झाल्या होत्या. पण कुणालाच त्या भुताचा सुगावा लागत नव्हता. साऱ्या घाबरल्या होत्या. भेदरल्या होत्या.

मिंकीही तशी थोडीफार भांबावली होतीच; पण घाबरली मात्र नव्हती. त्या दिवशी तिनं ते भूत ओझरते पाहिलं होतं. त्याच्या पायाचे ठसे तर कसे स्पष्ट उमटलेले दिसले होते. ते पाय या समोरच्या हॉलमध्ये शिरल्याबद्दल तिची खात्री होती. म्हणजे ते भूत या समोरच्या हॉलमध्ये नक्कीच लपलेलं होतं. अजून काही ते बाहेर पडलेलं नव्हतं. कारण त्याच्या पायाचे तसे ठसे काही तिला आढळले नव्हते. ती बारीक नजरेनं सारं पाहात होती. दिवस पावसाचे होते, त्यामुळे इतर मुलींचे पाय जमिनीवर स्पष्ट उमटत होते. मिंकीनं स्वतःचेही पाय उलटेसुलटे



उठवून पाहिले होते. तेही उठत होते. चांगले स्पष्ट दिसत होते. म्हणजे भुतानं आत बाहेर केलं तर ते तिला लगेच कळणार होतं; पण ते भूत मुळी बाहेर पडलेलंच नव्हतं. ते त्या हॉलमध्येच राहिलेलं होतं. मिंकीची त्याबद्दल अगदी बालंबाल खात्री होती. ती त्या भुताच्या मार्गावर होती. पण ते भूत मात्र तिला दिसलेलं नव्हतं.

परवा तिच्या शाळेला अर्ध्या दिवसाची सुट्टी मिळाली होती. आणि

बाईंच्या परवानगीनं ती वर्गातल्या मैत्रिणीकडे गेली होती. त्या मैत्रिणीच्या घरी तिनं 'Habits of the Ghost' हे पुस्तक पाहिलं आणि खेळणं बिळणं सोडून तिनं ते पुस्तक आधाशासारखं वाचून संपवलं. त्यावेळी तिची ती मैत्रीण मिंकीवर रागवलीसुद्धा. म्हणाली,

"हे ग काय मिंके! वाचायला आली आहेस वाटतं तू! चांगला लपंडाव खेळायचा तर बसली वाचत."

यावर कधी नाही ते मिंकी खोटं बोलली होती. आपलं पोट दोन हातांनी दाबून, रडवेल्या आवाजात बोलली होती,

"अग, खेळणारच होते ग मी. पण काय की बाई, माझं पोटच एकदम दुखायला लागलं. म्हणून बसले ग!"

मिंकीचा रडवा आवाज ऐकून मैत्रिणीची आई मिंकी जवळ आली होती. तिच्या पाठीवरून हात फिरवीत म्हणाली होती, "बसू दे ग तिला. दुखत असेल हो तिचं पोट. कसलं ते होस्टेलचं जेवण. थांब हं मिंकी; मी तुला सुंठसाखर खायला देते."

आणि पोट दुखत नसताही मिंकीनं ती सुंठसाखर खाल्ली होती. तिचं तोंड चांगलं पोळलं होतं. पण तिकडे लक्ष न देता ती ते पुस्तक वाचत राहिली होती. त्या पुस्तकात तिला कितीतरी गंमतीजमती वाचायला मिळाल्या होत्या. आणि त्याच पुस्तकात तिनं वाचलं होतं, मध्यरात्री बरोब्बर बारा वाजता भूत फिरायला निघतं. आणि म्हणूनच गेले दोनतीन दिवस ती या बारा वाजताची वाट पाहात होती. आज इतक्या दिवसांनी ती बाराचे ठोके ऐकत होती. अगदी टक्क डोळे उघडे ठेवून. आता तिला भूत दिसणार होतं. ते कसं चालतं, काय करतं, हे सगळं तिला पाहायला मिळणार होतं. ती आपल्या कॉटवर टक्क डोळे उघडे ठेवून झोपली होती. वर छताकडे पाहात होती.

खरं म्हणजे भूत शिरलं होतं त्या पलीकडच्या हॉलमध्ये.पण मिंकीची

खात्री होती, ते आता त्यांच्याच हॉलमध्ये आलेलं असणार. कारण काल परवाच त्यांच्या हॉलमधील एक मुलगी ओरडत उठली होती. तिचा भुतानं हात चावला होता. चक्क दात उठले होते. चांगले मोठेमोठे. थोडसं रक्तही आलं होतं. ती ओरडत उठली म्हणून सर्व मुली जाग्या झाल्या होत्या. मिंकीनं पळत जाऊन ज्ञानूला उठवलं होतं. ज्ञानूनं त्या मुलीच्या हाताला आयोडीन लावलं होतं. आयोडीन लावलं ते झोंबलं. झोंबल्यावर कुणीही रडणारच. पण ज्ञानू तिच्यावरच रागावला. म्हणाला,

"उगाचच ताप देतात या पोरी. काय बी झालं तरी म्हणं यास्नी भूत डसलं. आपण साफ साफ सांगणार मोठ्याबायना. काय पण दुसरं काम द्या. पण आता आपण नाय झोपणार हिथं. रोज रोज कोण कटकट करीत राहतंय."

मिंकीला त्यावेळी ज्ञानूचा रागच आला होता. त्या बिचारीला भूत चावलं होतं. आयोडीन झोंबलं होतं, आणि वर ज्ञानूचं हे असलं बोलणं ऐकून घ्यावं लागलं होतं. मिंकी त्या मुलीची समजूत घालायला लागली तसं ज्ञानूनं मिंकीला खसकन् बाजूला ओढलं आणि तो म्हणाला,

"मिंकीबाय तू दूर हो बघू ! या सगळ्या घोळाचं कारणच तू हायेस. जा जाऊन झोप आपल्या खाटेवर. चला ग, जा समद्या आपापल्या जागेवर. उगाच डोस्क्याला तरास !"

असं म्हणून ज्ञानूनं पटकन् दिवेच घालविले होते. त्या मिट्ट काळोखात मग मिंकी कितीतरी वेळ जागीच होती. त्या मुलीऐवजी ते भूत आपल्याला चावलं असतं तर ? इतक्या मुलींना ते भूत काय काय करीत होतं, पण अजून ते मिंकीच्या वाटेला गेलंच नव्हतं. एकदा त्यानं तिची मोटार चोरली होती. तेवढंच. मिंकी तर त्याच्याशी आमने-सामने करायला एका पायावर तयार होती. पण अजून काही पुन्हा ते भूत दिसलं नव्हतं. एकदाच काय ते त्या पावसात तिनं त्याला ओझरतं

पाहिलं होतं तेवढंच. परंतु त्यावरून ते कसं दिसतं हे काही तिला कळलं नव्हतं. ते तिला कळायला हवं होतं.

आता ती संधी आलेली होती. मध्यरात्रीचे बरोब्बर बारा वाजले होते. आता भुताचा वावर सुरू होणार होता. त्या हॉलमधून ते इकडे या हॉलमध्ये आलेलं होतं. दिवसा ते कुठल्याच कोपऱ्यात दिसलेलं नव्हतं. त्या पुस्तकात लिहिलेलं होतं, 'भूतं नेहमी उंचीवरची जागा पसंत करतात. ती अधांतरीसुद्धा उभी राहातात. कशालाही टांगून घेतात.' या हॉलमध्ये भुताला टांगून घ्यायला कितीतरी जागा होत्या. मिंकी डोळे ताणून ताणून वरच्या छताकडे पाहात होती. अगदी सावध चित्तानं.

आणि एकदम वर काहीतरी फडफडलं. मिंकी ताडकन उठून बसली. तिला चाहूल लागली होती. तिला दिसलं नव्हतं, पण नक्कीच काहीतरी फडफडल्याचा आवाज तिनं ऐकला होता. तिला वाटलं उठावं आणि दिवा लावून पाहावं. नक्कीच ते भूत असणार. कारण त्याशिवाय एवढ्या उंचावर कोण चढणार होतं? मिंकीनं शेजारच्या कॉटकडे पाहिलं. सुनीला शांत झोपली होती. या सुनीलात काहीच अर्थ नव्हता. मुळात ती मिंकीचा राग करीत होती. त्यामुळे मिंकीनं तिला उठवलं असतं तर तिनं नसता कांगावा केला असता आणि ज्ञानू माळी उगाचच मिंकीवर चिडला असता. तो तर आपल्यावर रागवण्याची संधीच शोधीत असतो.

मिंकी आपल्या कॉटवर बसून राहिली. डोळे उघडे ठेवून. वर मान करून. पण नंतर बराच वेळ तिला काहीच दिसलं नाही आणि ऐकूही आलं नाही. मानेला रग मात्र लागली.

आपली दुखरी मान मिंकीनं थोडी बाजूला केली आणि वरून काहीतरी टपकन तिच्या अंगावर पडलं. काळोखात काय पडलं ते कळा-यला मार्ग नव्हता. एकदा तिला वाटलं इतर मुली ओरडतात तसंच आपणही ओरडावं. पण तिनं मन आवरलं. ज्ञानूच्या भीतीनं नाही. तसं

ओरडणं तिला कमीपणाचं वाटलं. असं ओरडायला ती काय भित्री मुलगी होती. त्या भुतानं नक्की तिच्या मनातलं ओळखलं होतं. आणि तिला भीती दाखवावी म्हणूनच त्यानं ते काहीतरी तिच्या अंगावर वरून टाकलं होतं. काळोखातच मिंकीनं हातानं चाचपडून पाहिलं. पण तिच्या रगाखेरीज तिच्या हाताला काहीच लागलं नाही.

मिंकी कॉटवरून खाली उतरली. तिला काळोखातून सरळ बाथरूम-कडे जायचा रस्ता सहज चालता येत होता. ती तशीच काळोखातून बाथरूमकडे निघाली होती. आणि पुन्हा काहीतरी तिच्या डोक्यावरून फडफडत गेलं. आता अगदी जवळून. त्या फडफडण्याचा वाराही तिला जाणवला. म्हणजे ते भूत तिच्या मागोमाग येत होतं. ती मोरीत गेली की दिवा लावणार होती. म्हणजे मग ते भूत तिला नक्कीच दिसलं असतं.

मिंकी काळोखातून भराभर चालत होती. आता ती बाथरूमच्या अगदी जवळ आली होती. आणखी चार पावलं टाकली की ती मोरीत पोचणार होती. तिनं पाय उचलला आणि कुणीतरी मागून येऊन तिच्या अंगावर आदळलं. मिंकी धीट होती तिला काळोखाची भीती मुळीच वाटत नव्हती. आणि तरीही हे असं कुणी मागून येऊन अंगावर आदळल्यामुळे तिच्या नकळत ती ओरडली होती. चांगली मोठ्यानं दरडावून तिनं विचारलं होतं, " कोण आहे ?"

आणि येऊन आदळणारं भीतीनं थरथरत किंचाळत होतं. ' भूत-भूत— भूत-— भूत ! "

मिकीनं तो आवाज ओळखला. तो उषाचा होता. उषाही खरं म्हणजे चांगली धीट होती. उंच होती. आठवीत होती. म्हणजे मिंकीपेक्षा मोठीच होती. मिंकीनं उषाला घट्ट धरलं. ते पाहून उषा आणखीनच जोरानं किंचाळली. " भूत-भुतानं मला धरलं. धावा धावा भुतानं मला धरलं ! "

उषाचा आरडाओरडा ऐकून साऱ्या मुली उठल्या. आणि त्याही साऱ्या किंचाळत सुटल्या. दोन्ही हॉलमध्ये एकच गोंधळ उडाला. मिंकी आणि उषा एकमेकीला मिठी मारून उभ्या होत्या. मिंकी उषाला म्हणत होती, " अग उषा मी आहे. मिंकी. अग मिंकी ! "

आणि मग ज्ञानूचं मस्तक चढलं, ' हीच हीच बया ! हिच्या पायीच सारा घोळ होतो. ' ज्ञानू पुटपुटला आणि त्यानं उषाला मिंकीपासून दूर केलं. पण आता उषा पुन्हा मिंकीला मिठी मारीत होती. म्हणत होती, " मिंके मला वाटलं भूतच आहे ग ! रागवू नकोस. "

" ती बया कशाला रागवते. तिला ह्यो असलाच घोळ हवा असतो. चल ग ए, मिंके, चल झोपायला जा गुमान. "

ज्ञानू मिंकीवर गुरगुरत होता. पण मिंकीचं तिकडं लक्षच नव्हतं. ती त्या उजेडात वर पाहात होती. कांही दिसतंय का ते. मघाशीं तिनं चक्क फडफडणं ऐकलं होतं. भूत इथंच कुठंतरी वावरत होतं. ते फडफडणं त्याचंच होतं, मिंकीला त्याबद्दल मुळीच संशय नव्हता. पण तिचं हे सारं बोलणं ऐकणार कोण ? पुराव्यानिशी दाखवलं तरच या सर्वांचा विश्वास बसणार होता.

मिंकीला एकदम आठवलं, मघाशीं तिच्या अंगावर काहीतरी पडलं होतं ते काय हे पाहाण्यासाठी ती आपल्या कॉटकडे पळाली. उषाची मिठी सोडून.

ज्ञानूला वाटलं बरं झालं. गेली एकदाची पीडा झोपायला. आणि म्हणून त्यानं सर्वांना हाकलून दिवाच घालवला. मिंकीनं किती सांगितलं तरी त्यानं दिवा लावलाच नाही. आणि मिंकीला आपल्या अंगावर काय पडलंय ते कळलंच नाही. ती तशीच मनाशी चडफडत कॉटवर झोपली.

मिंकी कितीतरी वेळ जागी होती. ते भूत हे असंच मिंकीला हुलकावण्या देत होतं. मिंकीला तशी कुणाचीच मदत नव्हती. भुताला

शोधून काढायचं काम एकटीनं जमणार नव्हतं. त्याला मदतच हवी होती. या भुताचा तपास कसा लावायचा आणि त्याच्या त्या छळातून आपल्या या मैत्रिणींना कसं सोडवायचं याचा विचार करीत मिंकी पडली होती. तिला काही सुचत नव्हतं. या भुतानं तिला चांगलंच छळलं होतं. होस्टेलमध्ये आता हे एक नवंच काम तिच्या अंगावर पडलं होतं. ते पार पाडायचंच असं मिंकीनं पक्कं ठरवून टाकलं.

मनाशी असा निश्चय केला तेव्हाच मिंकीला जरा शांत झोप लागली. त्या झोपेतही तिला ते भूतच दिसत होते. त्या भुताचे ते मोठे थोरले पाय दिसत होते. तिला भास होत होता, ते भूत आपला एकेक पाय छताला लावून चाललंय. उलटं! त्याचे लांब लांब हात खालपर्यंत पोचत होते. त्या हातानं ते चुटकीसरसं तिच्या बॅगेचं कुलूप काढीत होते. त्यातली खेळणी घेत होते. वरच्यावर झेलत होतं. मिंकी डोळे विस्फारून सारं पाहात होती. त्याच्याशी बोलावं, गप्पागोष्टी कराव्या, चांगली दोस्ती करावी असं मिंकीच्या मनात आलं. त्या 'भुतांच्या सवयी' या पुस्तकात तिनं वाचलं होतं, ही भुतं तशी प्रेमळ असतात. त्यांच्या आत्म्याला जो सुख देतो, शांती देतो त्याला ती त्रास देत नाहीत. हा आत्मा म्हणजे काय हे मिंकीला कळलं नव्हतं. भुतांचा आत्मा कसा असतो, तो असा पृथ्वीवर का फिरतो हे तिला त्या पुस्तकात वाचून समजलं नव्हतं. भुताशी दोस्ती झाली तर ती त्याला सारं विचारणार होती. पण ती दोस्ती कशी करावी हेच तिला कळत नव्हतं. ती घटकेत भुताजवळ जाऊन उभी राहात होती तर घटकेत ती एकदम खाली धपकन् पडत होती. आणि असंच पडतापडता ती जागी झाली. ती कॉटवरून खाली पडली होती. म्हणजे सगळं स्वप्नच होतं तर!

## पाच

चिखलाच्या राड्यानं भरलेले भुताचे पाय मिंकी रोज रोज न्याहाळीत होती. ते आता वाळत चालले होते. पण तरीही त्यांचा आकार काही बदलत नव्हता. मिंकीची आणि उषाची त्या रात्रीपासून तशी गट्टीही जमली होती. आपल्या अंगावर भुतानं एक पीस कसं पाडलं हेही तिनं उषाला सांगितलं होतं. ते पीस कुणाचं असावं याचा त्या दोघींनी बराच खल केला होता. उषाचं म्हणणं होतं ते चिमणीचं असावं, तर मिंकीला वाटत होतं ते त्या भुताचंच असावं. कारण तिनं चक्क त्याचा फडफडण्याचा आवाज ऐकला होता.

उषाला बाकी सारं पटत होतं. पण तिचं म्हणणं थोडं वेगळं होतं. ती म्हणत होती, "अग तू जे फडफडणं ऐकलंस ना ते त्या चिमणी-चच असावं. भुतानं चिमणी पकडली असणार."

"चिमणी ? आणि ती कशाला ग ?"

"कशाला म्हणजे ? अग खायला."

"ईऽऽईऽ ! भूत चिमणी खातं ? अशी आख्खी ? जिवंत ?"

"मग ? चिमणीच काय, भुतांना सगळं चालतं. भूत खरं तर माणसं सुद्धा खातं. आख्खीच्या आख्खी !"

"चल ग ! बंडला नको मारूस. मी तर 'Habits of the Ghost' हे पुस्तकही वाचलंय. त्यात नव्हतं काही असलं."

"मग काय होतं ग ? मला पण एकदा वाचायचं आहे."

"वाचच तू उद्या. काय मस्त पुस्तक आहे ग ! छोटसंच आहे. फक्त पन्नास पानांचं. पण त्या पन्नास पानात सगळं सगळं लिहिलंय. ए उषा आत्मा म्हणजे काय ग ?"

“ आत्मा म्हणजे आत्मा. जाऊ दे बाई. तू उगाचच काहीतरी विचारात बसतीस. पण मी नक्की सांगते ती चिमणी भुतानंच पकडली असणार. म्हणजे मिंकी ते भूत आता तुमच्या हॉलमध्ये आलंय बरं का ! जरा सावध राहा. ”

मिंकीनं मान हलवली. पण तिला उषाचं हसूच आलं. मिंकी तर सावधच होती. खरं सावध राहायला हवं होतं इतर मुलींनी. मुख्य सुनीलानं. कारण सुनीला नेहमी कुणाशी ना कुणाशी भांडत राहायची. त्या पुस्तकात लिहिलं होतं, असंतुष्ट आत्मे भांडत असतात. आणि अशाच आत्म्यांना पिशाच्चयोनी पकडते. सुनीला भांडखोर होती. म्हणजे नक्कीच ती असंतुष्ट होती. खरं तर या असंतुष्ट शब्दाचा नीटसा अर्थ मिंकीला समजला नव्हता. तिनं त्याचा अर्थ अकरावीतल्या एका मुलीला विचारला होता, आणि ती पटकन् म्हणाली होती,

“ अग म्हणजे आपल्या ढंगाळेबाईंच्या सारखं. ज्यांचं काही केलं तरी समाधान होत नाही, ते लोक असंतुष्ट आत्मे. ”

“ अय्या, म्हणजे आपल्या ढंगाळेबाईंना पिशाच्चयोनी पकडणार तर ! मग ग ? ”

“ पकडणार काय, पकडलंच आहे त्यांना. पक्की संशयपिशाच्च बनली आहे ती ढंगाळेबाई. सगळ्यांची पत्र फोडून वाचते. मला फार राग येतो त्या भुताचा. ”

ती अकरावीतली मुलगी ढंगाळेबाईंना चक्क भूत म्हणाली होती. मिंकीला गंमत वाटली. ढंगाळेबाई छताला टांगून चालायला लागल्या तर कशा दिसतील या कल्पनेनंच तिला हसू आलं. आणि ती अशी हसत हसत जात असतानाच समोरून सुनीला आली.

मिंकीवर उगाचच रागावून ती म्हणाली, “ ए वेडपट एकटीच काय हसतेस ग ? मलाच हसत असणार तू ! ”

" तुला ? नाही बाई. अग त्या भुताला. आपल्या जवळच राहातं ! का हे भूत ! "

" मिंके ! काय वाटेल ते बडबडू नकोस. उगाचच का ग अशी सर्वांना घाबरवतेस ! आपल्याजवळ कशाला राहील ग ते ? "

" कारण तू असंतुष्ट आत्मा आहेस ना म्हणून ! "

" मिंके, मला शिव्या देतेस काय ? थांब मी बाईंनाच जाऊन सांगते तुझं नाव. दुष्ट ! खोटारडी ! "

" सुनीला, बाईंना नव्हे भुताला जाऊन सांग ! अग तेच भूत आहे समजलीस. विचार कुणालाही. "

मिंकी असं म्हणाली आणि खी–खीं हसत राहिली. सुनीलाला तर हसणं फारसं माहीतच नव्हतं. मिंकी हसली तशी सुनीला जास्तच चिडली. मिंकीचे केस ओढून ती दणदण पाय आपटीत निघून गेली.

सुनीलाच्या चालण्यानं तर मिंकीला आणखीनच हसू आलं. तिच्या मनात आलं, सुनीला ही अशी सदा चिडकी. असंतुष्ट आत्मा ! ती उषा म्हणते तेच खरं. ही सुनीला आणि त्या ढंगाळेबाई, या सदाच अशा, चिडक्या, रूसक्या. खरंच त्यांना या भुतानं धरलं तर ?

एकदा एका मुलीनं मिंकीला खूपच गंमत सांगितली होती. एका बाईला म्हणे भूत लागलं होतं. म्हणजे भुतानं तिला धरलं होतं. तर ती काय काय करायची ! उड्या काय मारायची. केस मोकळे ठेवून धावत काय सुटायची. माळ्यावर जाऊन काय बसायची. अगदी वेड्यासारखे चाळे करायची म्हणे. कित्तीतरी दिवस ते भूत असं तिच्यामागे लागलं होतं.

ढंगाळेबाई उड्या मारायला लागल्या तर कशा दिसतील हे मनात आलं आणि आधीच हसणाऱ्या मिंकीला फसुदिशी आणखीच हसू फुटलं ती एकटीच खो खो करीत हसत उभी राहिली.

समोरून ज्ञानू वाळलेले कपडे घेऊन येत होता. तिला असं एकटीला हसताना पाहून तो जवळ आला न् मोठ्या प्रेमानं त्यानं विचारलं, "मीनूबाय असं एकटीच काय हसतेस ग ?"

"हु–हु–ही–ही—अरे ज्ञानबा. ढंगाळेबाई–ही–ही—भूत–"

"मीनूबाय–तुला आता वेड लागलंय त्या भुताचं—"

"अं–ही–ही–हो–ही–ही—अरे सुनीला–उऽषा–हु–हु–"

ज्ञानूला नीटसं सांगताही येत नव्हतं, इतकं तिला हसू येत होतं. ज्ञानूनं तिच्याकडे पाहिलं, मान हालवली न् तो कपडे घेऊन आत गेला. जाता जाता त्याच्या हातातले दोन फ्रॉक्स खाली पडले. मिंकीनं ते पाहिले, पण तिला एवढे हसू येत होतं की, ते उचलायचं काही तिला सुचलं नाही.

रात्री साडेसातला जेवणं झाली की साऱ्या मुलींनी अभ्यासाला बसायचं असा नियम होता. त्यावेळी ढंगाळेबाई एकदा फेरफटका मारीत. कोण काय वाचतंय, काय करतंय हे सारं त्या पाहून जात. त्या दिवशीही त्या तशाच आपली रोजची फेरी मारीत होत्या. बरोबर त्यांची चमची सुनीला होतीच. सुरुवातीला मिंकीला या गोष्टीचं नवल वाटायचं. तिनं एकदा ढंगाळेबाईंनाच त्याबद्दल विचारलं होतं. तर त्या वसकन् ओरडून म्हणाल्या होत्या, "तुला काय करायच्या आहेत नसत्या चौकशा. ती माझी, मी नेमलेली मॉनीटर आहे. दिवसभरात तुम्ही कशा वागता ते मला कळावं म्हणून मीच घेते तिला बरोबर."

त्यानंतरच्या दिवसांत मिंकीला पुष्कळ गोष्टी कळल्या होत्या. सुनीलाची चमचेगिरी तर साऱ्या मुलींना माहीत होती. आताही बाई आणि सुनीला दोघींना बरोबर येताना पाहून रावी बोलली, "तो बघ चमचा कसा ढवळतोय ते. आज अगदी चिक्कार फेस येणार बरं का !"

मिंकीनं पुस्तकातली नजर वर उचलली. ढंगाळेबाई तिच्यासमोर



उभ्या होत्या. रावीचं बोलणं त्यांनी ऐकलं होतं किंवा काय हे कळायला मार्ग नव्हता. पण त्या मिंकीकडे मात्र रागाने पाहात होत्या.

त्या अशा पाहात होत्या आणि मिंकीला मात्र मघाच्या कल्पनेनं हसू येत होतं. बाईंच्यासमोर हसलेलं आवडायचं नाही हे खरं तर तिला

माहीत होतं. त्यासाठी ती हसू आवरण्याचा अटोकाट प्रयत्न करीत होती. तिची उडालेली तारांबळ रावीला दिसत होती. रावीही मनातून घाबरलीच होती. तिचं बोलणं कदाचित ढंगाळेबाईंनी ऐकलेलं असायचं. आणि त्याचाच राग त्या आता मिंकीवर काढायच्या. का कुणास ठाऊक ढंगाळेबाई मिंकीचा फारच राग करीत होत्या.

खूपसा प्रयत्न करूनही मिंकीला अखेर हसू फुटलंच. तिनं पुस्तकात डोकं खुपसलं, तोंडावर हात ठेवला, आणि तरीही तिच्या हसण्याचा आवाज आलाच. चांगला ऐकू येईल असा मोठ्यानं आला.

सुनीलालाही तो ऐकू गेला. ती बाईंना म्हणाली,

" बाई, ही अशीच, अशीच हसत होती मघाशी सुद्धा. आणि बाई, ती तुम्हाला भूत म्हणाली. अगदी स्पष्ट भूत म्हणाली."

" नाही हो बाई! मी नाही म्हणाले, ती—"

आणि मिंकी एकदम गप्प झाली. नकळत ती उषाचं नाव घेणार होती. असं कुणाला कुणाचं नाव सांगायचं नसतं असं तिला आजीनं नेहमी शिकवलं होतं, याबाबतीत तिनं मिंकीला कितीतरी गोष्टी सांगितल्या होत्या. खंडोजीची गोष्ट तर मिंकीला तोंडपाठ होती. कितीही छळ झाला तरी त्यानं राजाराम महाराज जिंजीकडे गेल्याचे मोगलांना सांगितलेलं नव्हतं. मग ही तर अगदी साधी बाब होती. मिंकी उषाचं नाव मुळीच सांगणार नव्हती. ढंगाळेबाईंनी काहीही केलं तरी.

मिंकी अशी एकदम गप्प बसलेली पाहून ढंगाळेबाई एकदम चिडल्या. मिंकीच्या हाताला धरून त्यांनी तिला उभी केली. आणि तिचा गालगुच्चा घेत म्हणाल्या, " का ग, सांग ना, तू नाही तर कोण म्हणालं मला भूत? बोल नाही तर बघ. माझ्याशी गाठ आहे. समजलीस!"

ढंगाळेबाई तावातावानं बोलत होत्या. आणि मिंकी ओठ आवळून

म. गं. र. ... वाचनालय शाखा.
दा. क्र 900 दिनांक 4/8/64
विषय
क्र.........

गप्प उभी होती. बाईंनी तिचा गाल अगदी लालेलाल करून टाकला. तरी मिंकी एक शब्द बोलली नाही. सुनीला मधून मधून ढवळाढवळी करीतच होती. ती बाईंना म्हणाली, " बाई ही म्हणत होती की तुम्ही–"

" काय ? " ढंगाळेबाई ओरडल्या.

बाई एवढ्या जोरात ओरडल्या की गॅलरीतला ज्ञानू तिथं धावत आला. अलीकडे मुलींच्या सोबत म्हणून ज्ञानू गॅलरीत झोपायला येत होता. तो आठ–साडेआठलाच आपली पथारी पसरत होता. तो तिथं धावत आला, तेव्हा त्यांच्या हातात त्याची गोधडी होती. निळ्या–हिरव्या लुगड्यांची. बाईंनी ते पाहिलं आणि त्या ज्ञानूवरही रागावल्या. त्याला म्हणाल्या, " आधी ती गोधडी नीट ठेव पाहू. तुझ्या या वेंधळेपणाचा एक मला त्रास होतो बघ. कुठं टाकलेस ते दोन फ्रॉक कुणास ठाऊक ! "

एवढा वेळ गप्प असलेली मिंकी एकदम बोलली, " बाई ते फ्रॉक मघाशी ज्ञानू कपडे नेत होता तेव्हा खाली पडले होते. "

" मग उचलले का नाहीस ? उचललेस की नाही ? खरं बोल ! "

"मी नाही उचलले. खरंच नाही उचलले. मी नुसतेच पाहिले. "

" खोटं बोलतेस ? पडलेले फ्रॉक पाहिलेस आणि उचलले नाहीस हे कुणाला खरं वाटेल काय ? तुझ्यासारखी उचापती मुलगी आपल्या होस्टेलमध्ये दुसरी कुणी नाही. मला पक्कं माहीत आहे हे. तूच उचललेस ते फ्रॉक ! "

" मी ? मी कशाला उचलू ते कुणाचे फ्रॉक ? मला काय करायचं आहे त्या फ्रॉकशी ? मी फक्त ते पडलेले तेवढं पाहिलं. "

पण मिंकीचं हे बोलणं काही बाईंना पटलं नाही. सुनीलाला ते पाहून बरं वाटत होतं. ती मिंकीला म्हणाली, " काय ग तू नाही मग काय त्या भुतानं पळवले काय ते फ्रॉक ? "

भुतानं ? मिंकीचे डोळे एकदम लकाकले. खरंही असेल सुनीलाचं बोलणं. ती तसं बाईंना सांगणारही होती. पण तिचं काही ऐकायला एक तर बाई तयार नव्हत्या, आणि दुसरं म्हणजे नंतर बाई तिथं थांबल्याच नव्हत्या. मिंकीवर रागावत रागावत त्या खाली निघून गेल्या.

बाई गेल्या आणि सुनीला आपल्या जागेवर येऊन बसली. रावी तिला म्हणाली, "काय ग, बाईंच्याजवळ चहाड्या करतेस काय ? चहाडखोर कुठली. हिच्याशी कुणी बोलू नका ग !"

"माझं तरी कुठं अडलंय खेटर ! पण एक लक्षात ठेवा, या मिंकीचं सगळं ढोंग आता बाईंना समजलंय बरं का. म्हणे भूत आहे या होस्टेल-मध्ये. पूर्वी नव्हतं आणि आताच कसं आलंय ग ते ?"

"सुनीला रागावू नकोस. पण आलंय हे खरं ना ? त्या दिवशी तूच तर होतीस माझ्याबरोबर. मी दाखवलं नव्हतं का ते भूत तुला ?"

मिंकीनं त्या दिवशीची आठवण काढताच सुनीला घाबरली. ती त्या दिवशी मिंकीला तिथंच पारावर टाकून पळाली होती. मिंकीनं भुताच्या पावलाचे ठसे सर्वांना दाखवले होते. ते अजूनही दारात होतेच. सुनीला भीतभीतच म्हणाली, "पण–पण मिंके ते ते मला कुठं दिसलं होतं ? तू म्हणालीस म्हणून मी पळाले."

सुनीलाच्या या बोलण्यानं सगळ्याच हसल्या. पण मग एकदम गंभीर झाल्या. कारण बाहेरून पुन्हा फडफड आवाज ऐकू आला. परवा हा असाच आवाज मिंकीला ऐकू आला होता. अगदी मध्यरात्री. आता तर अवघे नऊच वाजले होते. म्हणजे अजून भुताला यायला पुष्कळ अवकाश होता. आणि तरीही हा असा फडफड आवाज सर्वांनीच ऐकला होता. त्यांनी समोरच्या हॉलकडे पाहिलं. त्या सर्व मुली अभ्यासात गढून गेल्या होत्या. त्यांना भुताचा हा आवाज ऐकू आला होता का नाही कुणास ठाऊक. पण या सर्वांनी तो कसा स्पष्ट ऐकला होता. भूत

यांचं सारं बोलणं ऐकत असावं. कुठं लपलं असेल ते भूत कुणास ठाऊक.

मिंकीला वाटलं कुणाला तरी बरोबर घ्यावं आणि सगळे कोपरे धुंडाळावे. इथंच कुठंतरी ते भूत बसलं असणार नक्की.

तिनं अपेक्षेनं चारी बाजूला दृष्टी टाकली. पण कुणाचीच तशी तयारी दिसली नाही. साऱ्याच त्या आवाजानं भेदरल्या होत्या. उषा म्हणाली होती, "भूत आख्खी चिमणी खातं." त्या चिमणीच्या धडपडीचा तर हा आवाज नसेल? म्हणजे भूत आता एखादी चिमणी खात असणार. तेवढ्या चिमणीनं त्याचं पोट भरणार नाही. मग ते आणखी काही शोधायला येणार. त्याला माणसंसुद्धा आवडतात.

त्या कल्पनेनंच मिंकी शहारली. या भुतानं आज तिच्या डोळ्यांदेखत दोन फ्रॉक पळवले होते. कमालच होती त्याची. कदाचित् ते इथं असं आपल्यासमोर उभंसुद्धा असेल. अशी गुप्तरूपं घेता येतात म्हणे त्याला. तिनं ते त्या पुस्तकात वाचलं होतं. ते कुणाचही रूप घेतं. कदाचित् ही सुनीला, खरी सुनीला नसेलच. भूतही असू शकेल. म्हणूनच ती अशी बोलते. पण मग ती मघा भुताचं नाव घेतलं तर घाबरली कशी? का तेही भुताचं नाटकच?

मिंकीचं डोकं अगदी चक्रावून गेलं. छे! हे असं तिला पूर्वी कधीसुद्धा झालेलं नव्हतं. पूर्वी ती फटाफट सारं ठरवीत होती, करीत होती. असा गोंधळ कधीच उडाला नव्हता तिचा.

त्या रात्री मिंकीला नीटशी झोप आलीच नाही. ढंगाळेबाई, सुनीला आणि ते भूत यांचाच घोळ तिच्या डोक्यात चालला होता. ती दोन-तीन वेळा बाथरूममध्ये गेली होती. पण पुन्हा काही तिला तो फडफड आवाज ऐकू आला नव्हता. ज्ञानू मात्र एकदा तिच्यावर ओरडला होता, "मीनूबाय तुला झोपच येत नाही काय?"

पण तिलाही तसंच वाटत होतं. हा ज्ञानू तरी असा भलत्या वेळी

जागा कसा ! आणि तो इथं या हॉलच्या दाराशी काय करीत होता ? आणि त्याच्या हातात ते काय होतं ?

मिंकी त्याला तसं विचारणार होती. पण ज्ञानू तिच्या जवळ आला न् म्हणाला, " मिंकी आता झोप बरं ! तुझ्या डोस्क्यात ते भूतच बसलंय. अशानं तुलाच तरास होईल बघ. "

ज्ञानू किती प्रेमानं तिच्याशी बोलला होता. नाहीतर अलीकडे ज्ञानू, ढंगाळेबाई आणि सुनीला सारेच तिच्याशी रागावून रागावून बोलत होते. तिचं कुणीच ऐकून घेत नव्हतं. आपल्याला काय वाटतंय ते कुणाला कसं सांगावं हेच मिंकीला कळत नव्हतं. या शाळेत आल्यापासून तिच्या मनाचा अगदी गोंधळ उडाला होता. तिची पूर्वीची शाळाच चांगली होती. तिथं हे असलं काहीही नव्हतं. त्या शाळेत परत जावं असही तिला वाटत होतं. पण असं भिवून जाणारी मिंकी नव्हती. तिला इथंच राहायचं होतं. राहायलाच हवं होतं.

## सहा

गेले कितीतरी दिवस मिंकी अगदी गोंधळून गेली होती. हे असं कसं होतंय तेच तिला कळत नव्हतं. त्या दिवशी तिनं त्या भुताला त्या हॉलमध्ये शिरताना नक्की पाहिलं होतं. पाहिलं होतं म्हणजे काय चक्क त्याच्या पावलाचे ठसे उमटलेले तिनं सर्वांना दाखवले होते. चिखलात लडबडलेले त्याचे पाय जमिनीवर अगदी स्पष्ट उमटले होते. मग तिनं कितीतरी दिवस त्याच्यावर पहारा ठेवला होता. ज्ञानू माळी फरशी पुसायला आला की ती त्याला म्हणायची, " माळीबाबा, ते पाय तसेच राहू द्या. "

" अवो पण मीनावाय, हे असं राड ठेवलं तर मोठ्या बाई मला रागवतील. तुम्ही जाल सुटून." माळी बोलला.

मिंकीला ते पटायचंही. पण तिला वाटायचं, दोनचार दिवस हे ठसे इथं राहिले तर बरं होईल. कितीतरी मुलींनी ते पाहिलेले नाहीत. सर्वांनी एकदा ते पाहिले की बरं. म्हणजे मग कुणालाही ते भूत दिसलं तरी चटकन् ओळखता येईल. तसं तिनं रावी, उषा, सुनीला, बेबी वगैरे आपल्या बऱ्याचशा मैत्रिणींना ते दाखवले होते. आपल्या कामात त्यांनी मदत करावी अशी विनंतीही तिनं त्यांना केली होती. सुनीलाखेरीज सर्वांनी तिला मदत करायचं कबूलही केलं होतं. सुनीला मात्र नेहमीसारखी तिढ्या आवाजात बोलली होती, " या मिंकीचं काय ऐकताय तुम्ही ! अशी भूतं आपल्याला सापडणार आहेत ? मरून जाईल एकदा तेव्हा कळेल. आपण मुळीच त्या फंदात पडणार नाही."

आणि सुनीलाच्या या बोलण्यावर तेवढ्याच निर्धारानं मिंकी म्हणाली होती, " मेले तरी बेहेत्तर ! मला इतिहास आवडतो. आपण इतिहासाचा अभ्यास काही उगीचच करतो काय. मी मेले आणि माझ्यामुळे या होस्टेलमधलं भूत नाहीसं झालं तरी त्याचा मला आनंद आहे."

" आणि तुझ्या आजीचं काय ग ?"

सुनीलानं खवचटपणानं विचारलं होतं. ते ऐकून मिंकी एक अर्धाक्षणच मोठी गांगरली होती, पण दुसऱ्याच क्षणी ती मोठ्या अभिमानानं म्हणाली होती, " ऊं ! माझी आजी काही अशी रडूबाई नाही. तिनंच मला बाजीप्रभू आणि तानाजीच्या गोष्टी सांगितल्या आहेत. ती म्हणेल, शाब्बास ग मिंके. आपल्या होस्टेलवरचं भूत पळवलंस. शाब्बास."

मिंकीच्या या तडफदार आणि तेजस्वी बोलण्यानं रावी, उषा साऱ्या भारावल्या होत्या. उषा मोठ्या ऐटीत बोलली होती, " ही मिंकी म्हणजे आमचा शिवाजी. मिंके मी तुझा तानाजी. बेहेत्तर आहे जीव गेला तरी,

पण हा भुताचा गड सर करायचाच."

सगळ्याच जणी अशा मिंकीला मिळाल्या होत्या. त्या सर्वांनी त्या पावलांचे ठसे नीट पाहून ठेवले होते. त्या ठशाभोवती खडूनं एक मोठं वर्तुळही काढून ठेवलं होतं त्यांनी. पण एक दिवस त्यांची नजर चुकवून झानू माळ्यानं ते सारंच साफ पुसून टाकलं होतं. मिंकी ते पाहून अतिशय खट्टू झाली. पण सुनीला टाळ्या पिटीत म्हणाली, "छान झालं मोठा आव आणलाय भूत पकडण्याचा. जशी काय ही म्हणजे कुणी गुप्त हेरच."

मिंकीनं तिला उत्तर दिलं नव्हतं. सुनीला आपल्या सगळ्या गोष्टींना विरोधच करते हे तिला आता कळलं होतं. ती मुकाट्यानं रावीकडे गेली. तिनं आणि रावीनं मिळून लक्षात होतं तसं त्या पायांचं चित्र काढलं. मग त्या चित्राच्या त्यांनी आणखी बऱ्याच कॉपीज काढल्या. आणि त्या मुलींना वाटल्या. त्या कॉपीजखाली लिहिलं होतं, "अशा पायाचं कुणी दिसल्यास ताबडतोब मीना—उर्फ मिंकीकडे वर्दी द्यावी. मिंकी न भेटल्यास रावी किंवा उषा (आठवीतली, उंच-काळी-तानाजीसारखी-नव्हे आमचा तानाजीच) हिजकडे वर्दी पोचवावी. उशीर वा विलंब किंवा आळस करू नये. त्यात तुमचेच नुकसान आहे. हे एक महान कार्य आहे असे समजावे."

नेमक्या आणि शेलक्या मुलींच्या हातात ती पत्रकं दिली तेव्हा मिंकीला एकदम हायसं वाटलं. आता दोन चार दिवसांत भूत नक्की सापडणार याची तिला खात्री वाटली. तसं तिनं आपल्या तानाजीजवळ म्हणजे उषापाशी स्पष्ट बोलूनही दाखवलं. त्या दोघींनी जागता पहारा करण्याचं ठरवून टाकलं.

आणि गेले आठ दिवस मिंकी अगदी डोळ्यांत तेल घालून सारं पाहात होती. तिच्या मैत्रिणी तिला काही काही बातम्या पुरवीत होत्या.

मिंकी त्याप्रमाणे धडपडत होती, पण शेवटी सारा वार फुसकाच ठरत होता. आणि असं काही घडलं की ती दुष्ट सुनीला खवचटपणानं हसत होती. ते पाहून मिंकी मग अधिकच चडफडत होती.

भूत पळून गेलं असं मानायला मिंकी तयार नव्हती. कारण अजूनही चोऱ्या होतच होत्या. कुणाचं काही, कुणाचं काही हरवत होतं. ज्ञानू माळी हल्ली बाहेर व्हरांड्यात झोपत होता. भूत पकडावं म्हणून मोठ्या बाईंनी मुद्दाम त्याला इथं झोपायला सांगितलं होतं. ज्ञानू माळी गोष्टी छान सांगायचा. सगळ्या मुली त्याच्या भोवती जमत होत्या. वेळी अकरावीच्या मुलीसुद्धा अभ्यास टाकून गोष्ट ऐकायला यायच्या. ज्ञानूला भुताच्याच सगळ्या गोष्टी माहीत होत्या. ढंगाळेबाई एकदा साडेनवाची त्यांची फेरी झाली की खाली त्यांच्या घरी जात होत्या. त्या जाईपर्यंत लहान मुली झोपायचं सोंग करीत, न् मोठ्या मुली अभ्यासाला बसत. पण एकदा का ढंगाळेबाई जिना उतरून गेल्या, त्यांच्या घरातला दिवा विझला की मुली उठून ज्ञानूभोवती गोळा होत. त्या भुताच्या गोष्टी भयंकर असत. ज्ञानू मग मिंकीला म्हणे, "ए मिंकीबाय, म्हणूनशान तुला सांगतो, बाई ग हे भुताचं काम लयी वंगाळ. असं हितं बसंल, न् तिथं दोन मैलावरचं फळ अचूक तोडून खाईल. बसल्या जागी त्याला चार हात फुटतात. हा एकेक लांबलांब वाशासारखा."

ते सारं ऐकलं की क्षणभर मिंकी बावरून जात होती. पण क्षणभरच. पुन्हा तिच्यातली जिद्द जागी व्हायची. हे भूत प्रकरण काय असतं ते तिला एकदा समजावून घ्यायचं होतं. मग ती रात्ररात्र जागं राहाण्याचा प्रयत्न करायची. पण मध्येच कशी कोण जाणे झोप लागायची. नेमकं त्याचवेळी ते मेलं भूत काहीतरी करून जायचं.

एकदा तर त्या भुतानं मजाच केली. उपा एवढी शूर! स्वतःला



तानाजी म्हणत्रणारी. पण त्या दिवशी उषा रात्री बाथरुमला उठली तर तर त्यानं उषाच्या पुढ्यातच टपकन् एक पाण्याचा फुगा फोडला. तो कुठून आला, कसा आला कळलंच नाही. एकदम आवाज झाला न् पाणी

अंगावर उडालं म्हणताना उषा किंचाळली. शूर असली तरी असं काही अचानक अंधारात झालं म्हणजे कुणीही घाबरणारच. उषाची किंचाळी ऐकली तशा सर्व मुली भराभरा उठल्या. कुणीतरी दिवा लावला. मग ज्ञानू सावकाश डोळे चोळीत चोळीत आला. पाहिलं तर खरंच उषाच्या तोंडापर्यंत पाणी उडालं होतं. ज्ञानू लौकर लौकर खाली गेला. त्यानं ढंगाळेबाईंना उठवून आणलं. दिवे लावून सगळीकडे पाहिलं, पण कुणीच नव्हतं. ज्ञानूबरोबर ज्ञानूचा टॉमीही अलीकडे वर असायचा. बाई म्हणाल्या, " भूत दिसलं असतं तर हा टॉमी नक्कीच ओरडला असता. तसला काही प्रकार नाही. झोपा आता. "

बाई झोपा म्हणाल्या म्हणून थोडीच झोप येणार होती ? मिंकीला तर मुळीच शक्य नव्हतं झोप येणं. ती सारखी वळवळत होती. आणि मध्येच बेबी रडत उठली. खरं म्हणजे बेबी नेहमी अगदी गाढ झोपायची. मघाशीसुद्धा एवढा गोंधळ झाला, पण ती जागी झाली नव्हती. आणि आता जरा मिंकीच्या डोळ्यांवर झापड येत होती, तेवढ्यात बेबी रडत उठली होती. मिंकी लगेच उठली न् बेबीच्या जवळ गेली. बेबीला जागं करीत तिनं विचारलं, " काय झालं ग बेबी ? काय झालं ? "

पण उत्तर न देता बेबी रडतच राहिली. कितीतरी वेळ. खूप समजावलं तेव्हा ती बोलली. भुतानं तिचा फ्रॉकच फाडला होता. ते आलं आणि त्यानं टर्रकन् बेबीचा फ्रॉक फाडला. मिंकीनं हात लावून पाहिलं, खरंच बेबीचा फ्रॉक फाटला होता. कुणीतरी वेडावाकडा फाडला होता. मिंकीला वाटलं, ओरडावं, खूप मोठ्यानं ओरडावं, सगळ्या मुलींना उठवावं, सगळ्या एकदम उठल्या, चारीबाजूला धावल्या, भुताला असा घेराव घातला तर ते नक्कीच हाती सापडेल. ती ओरडणारही होती, पण तेवढ्यात ज्ञानू माळी उठून आला. थोड्या रागातच बोलला, " काय ग ए मिंके, तुला काय खूळबिळ लागलंय का काय ? चल झोप

जागला."

" पण—पण माळीबाबा. बेबीचा फ्रॉक फाडलाय भुतानं."

" काय तरी बिलाबत हाये बघ तुझी. आता झोपतेस का...." ज्ञानू असं रागानं बोलला आणि बेबीनं भिंतीकडे तोंड केलं. मिंकी मात्र तिथंच धुसफुसत उभी होती. एवढ्या जवळ, इतक्या सबळ पुराव्यासह भूत सापडण्याची आलेली संधी ज्ञानू माळ्यानं घालवावी याचं मिंकीला मोठं नवल वाटत होतं. पण तिचा इलाज नव्हता. ती तशीच चरफडत येऊन आपल्या कॉटवर झोपली.

हे आणि असंच काहीतरी सारखं घडत होतं. मुलींना भूत वावरतंय ते कळत होतं. ते भूत मोठं चपळ होतं. त्याची हातचलाखी तर दांडगी होती. एका मुलीला चॉकलेटचा डबा आला होता. तिनं सर्वांना चॉकलेट वाटली न उरलेली आपल्या कॉटखाली डब्यातच ठेवली. तरी उषा तिला म्हणालीही, " ए डबा असा ठेवतेस, पण पाहा हं कुणीतरी पळवून नेईल तेव्हा कळेल बरं का ! तू आपली तो सरळ ट्रंकेत ठेवून दे."

" नको बाई. मग किनई साऱ्या कपड्यांना मुंग्या येतात बघ."

" आणि मग तुमच्यासारखे शिवाजी, तानाजी असताना एवढी भीती हवीच कशाला ? राहिना का तो डबा तिथं कॉटखाली. खरं ना ?"

नेहमी प्रमाणेच सुनीला खवचट, कुचकं बोलली होती. खरं तर त्यावेळी सुनीलाशी चांगलं भांडावं असं मिंकीला वाटलं होतं. पण मागच्या आठवड्यात आजीचं तिला पत्र आलं होतं. मिंकीनं सुनीला आपल्याशी कशी वागते, कसं बोलते ते सारं आजीला कळवलं होतं, आणि त्यावर आजीनं लिहिलं होतं, " मिंकी आपण नेहमी सर्वांशी चांगलं वागावं. कुणी वाईट वागलं, वाईट बोललं, भांडलं—तंडलं तरी ते मनात ठेवू नाही. त्यानं स्वतःचंच मन कुढं बनतं. सुनीलाला बिचारीला वडील नाहीत. आई लहानपणापासूनच दूर, मामीचा कडक स्वभाव, म्हणून

ती अशी झाली. खरं ती फार चांगली मुलगी आहे. तिच्याशी, नाही सर्वांशीच प्रेमानं वाग. शहाण्यासारखी वाग."

आजीचं ते पत्र मिंकीला पाठ झालं होतं; पण सुनीला ही अशी नेहमी नेहमी कुचकं बोलते. माणसाला कधीतरी राग येतोच. आताही मिंकीला तसाच राग आला होता. ती सुनीलाला म्हणाली, "आम्ही तर आहोतच शिवाजी-तानाजी पण तुझ्यासारखे सूर्याजी पिसाळ आहेत ना म्हणून ते भूत सापडत नाही."

अर्थात मिंकीच्या या बोलण्याचं नेहमीप्रमाणेच खूप मोठं रामायण घडलं होतं. ढंगाळेबाई तिला रागावल्या होत्या आणि कधी नाही तो ज्ञानू माळी म्हणाला होता, "या मिंकीला लयीच शाणपण वाटतंय समद्या गोष्टींचं. नसती बलामतच झालीय ही पोरगी आल्यापासून. तवा काय भूतं नव्हती का चोऱ्या होत नव्हत्या? पण असा एवढा घोळ नव्हता बा कुणी घातलेला. गप गुमान बसायचं सोडून या बयेला लयीच भानगडी न् उचापती करायला लागल्यात."

मिंकीनं सारं मुकाट्यानं ऐकून घेतलं...ती उषाला म्हणाली, "मला या सगळ्या मुलींचं नवल वाटतं. त्यांच्या वस्तू जातात तरी त्या गप्प बसतात. पालक तक्रार करतात, झालं. संपलं. ते काही नाही. उषाताई, आपण या गोष्टीचा तपास लावायचाच हं! बघू या आता तो चॉकलेटचा डबा जागेवर राहातोय का जातोय."

पण दोन तीन दिवस तो डबा तसाच जागेवर होता. ती मुलगी रोज त्यातली दोन चॉकलेट खायची. फक्त दोनच. म्हणायची, "खूप दिवस पुरवणार आहे मी ती."

आणि एक दिवस तिनं डबा उघडला. डब्यात अवघी दोनच चॉकलेट. ती ओरडली, "माझी चॉकलेटं भुतानं पळवली. काल खूप होती. आज दोनच राहिली. शपथ काल खूप होती."

आणि मग सगळ्या मुली तिच्याजवळ गोळा झाल्या. मुलींपैकी चॉकलेट कुणी खाल्लेलं नव्हतं. प्रत्येकीनं शपथ घेतली. कुणी गळ्याची, कुणी कंठाची, कुणी विद्येची, कुणी कुणीतर आपल्या तोंडाचा वासही दिला. सुनीला दूर उभी होती. सारं पाहात होती. रावी तिला म्हणाली, " आता काय म्हणायचं आहे सुनीला तुला ? "

" मला काहीच म्हणायचं नाही. एवढा शिवाजी इथं आहे, मग मी कशाला काय बोलू ? "

" नकोच बोलूस ! पण तुला आता बरं वाटलं असेल नाही ग ? वाटत असेल बरी मिंकीची ' फ ' झाली. " उषा बोलली.

मिंकी मात्र आपले निळे निळे डोळे किलकिले करून विचार करीत उभी होती. चॉकलेटं पळवली होती. डबा जागीच होता. ही गोष्ट कधी झाली होती ? रात्री ? सकाळी की त्या सगळ्या शाळेत गेल्यावर दुपारी ? पण हल्ली अकरावीच्या पुष्कळ मुली इथं येऊन अभ्यासाला बसतात. त्यांना नसेल कसली चाहूल लागली ? का या भुताजवळ कसली जादू आहे ?

एवढा गोंगाट चालला होता. मुली मोठमोठ्यानं काही बाही बोलत होत्या. पण मिंकी गप्प होती. आपले ओठ तिनं गच्च आवळून धरले होते. तिच्या गोऱ्यापान कपाळावरच्या आठ्या स्पष्ट दिसत होत्या. ती विचार करीत होती. कसला ते मात्र तिला नीटसं कळत नव्हतं. गेल्या दोनतीन दिवसांत त्या डब्याला हात लागला नव्हता. कारण मिंकीचं सारखं लक्ष होतं. दोन दिवस शाळेला सुट्टी होती, तरी मिंकी खेळायलाही फारशी खाली गेली नव्हती. काहीतरी निमित्त काढून ती वरच्यावर राहिली होती. त्या डब्याकडे लक्ष ठेवीत होती. पण आज शाळा होती. ती शाळेत गेली होती आणि इकडे ती चॉकलेटस चोरीला गेली होती. मिंकीनं नुकतंच एक पुस्तक वाचलं होतं. छान होतं. गुप्त हेर

खात्याचं. त्यांच्याकडे कसलीतरी पावडर असते म्हणे. त्या पावडरीमुळे पोलिसांना चोराच्या बोटांचे ठसे सापडतात. मग चोर सापडतो. आपल्या जवळ तशी पावडर असायला हवी होती. भुताच्या बोटांचे, हाताचे ठसे आपल्याला समजले असते. आणि मग— "

आणि मग काय ? मिंकीला काहीच कळेनासं झालं होतं. तिच्या-जवळ भुताच्या पायाचे ठसे होतेच की. चांगले तिनं स्वतः काढलेले. आता महिना उलटला होता. पण अजून कधी कुणालाच त्या भुताचा पत्ता लागला नव्हता. दिवसभर मिंकी त्याच गोष्टीचा विचार करीत होती. शाळेतही तिचं नीटसं लक्ष लागत नव्हतं. मधल्या सुट्टीत ती रावीला म्हणाली, " रावी आज आपण जरा मागच्या बाजूला जाऊ या का ग ? "

" का ग ? त्या बाजूला फार गवत वाढलंय बाई ! "

" असेना का वाढलेलं गवत. आपण जरा जाऊच या त्या बाजूला. मी अजून तीच बाजू नीटशी पाहिलेले नाही. तू पाहिली आहेस ? "

" मागच्या वर्षी एकदा लपंडाव खेळताना गेले होते तिकडे. पण मला बाई भीतीच वाटली. कसं सुनंसुनं, न् पडकं पडकं वाटतं. "

" तिकडे म्हणे पूर्वी स्मशान होतं ? आपलं नाही. ख्रिश्चन लोकांचं. सुनीला म्हणत होती, अजून तिकडे काही काही क्रास उभे आहेत. रात्री स्मशानातच भुतं राहातात नाही ग ? "

" म्हणूनच मला भीती वाटते तिकडं जायची.

" ह्यॅ ! आपण तर भुताचा शोध घेणार आहोत. चल ना !

रावीनं मिंकीला मदत करायचं कबूल केलं होतं. मिंकीचं म्हणणं तिला कबूल करावं लागलं. त्या हातात हात घालून होस्टेलच्या मागच्या बाजूला गेल्या. खरोखरच तिथं खूप गवत वाढलेलं होतं. त्या गवतावर पांढरी पांढरी फुलं आलेली होती. मिंकी त्या फुलांच्याकडे पाहात होती.

रानटी असली तरी ती फुलं किती छान दिसत होती. मिंकीनं एक गुच्छ तोडला. त्याला वासही कसा वेगळाच येत होता. मिंकीनं तो गुच्छ टाकला, आणि उगाचच दुसरा तोडला. मागच्या बाजूची कितीतरी जागा मोकळीच होती. चांगलं मिंकीच्या कमरेइतकं गवत वाढलेलं होतं आणि त्या गवतातूनच मधून मधून पांढरे क्रॉस उभे होते. मिंकी त्या प्रत्येक क्रॉसकडे पाहात होती. यापैकी कुठल्या तरी क्रॉसखाली नक्कीच ते भूत राहात असणार. हे भूत आहे ख्रिश्चन धर्माचं म्हणूनच ते, मुली रामराम म्हणतात तरी यायचं थांबत नाही. काय करायचं ते केल्या-शिवाय राहात नाही.

मिंकीनं एकदा आपल्या पपांच्या मित्राकडे गेलेली असताना, येशू ख्रिस्ताचा पुतळा पाहिला होता. अशाच क्रॉसवर लटकवलेली त्याची मान पाहून तिला त्यावेळी खूप वाईट वाटलं होतं. तिनं त्या पुतळ्याकडे निरखून पाहिलं, आणि क्षणात तिला वाटलं, हा येशू ख्रिस्त आपल्याकडे मोठ्या प्रेमळ नजरेनं पाहातोय. मग ती कितीतरी वेळ त्या पुतळ्याकडे पाहात होती. पपाचे ते मित्र तिच्याजवळ आले न् तिला येशूला नमस्कार कसा करायचा ते दाखवलं होतं. ते तिला त्या कॉसकडे पाहून आठवलं. मिंकीनं डोळे मिटले. आपल्या खांद्यावर दोन्ही बाजूंना हात लावले, पुन्हा तोच हात तिनं कपाळापासून खाली नेला न् ती 'आमेन' म्हणाली. रावीनं विचारलं, काय करतेस ग ?

" अग हा क्रॉस आहे नं, अशाच क्रॉसवर येशू ख्रिस्त असतो. त्याची प्रार्थना केली."

" अय्या ! तू कसली येशूची प्रार्थना केलीस ? तो का आपला देव आहे ? लोकांच्या देवाला कशाला नमस्कार करायचा ग ! "

" वा ! असं काही बोलायचं नसतं हं ! देव सगळ्यांचाच असतो. देव सर्वांचा असतो आणि तो एकच असतो असं सांगते मला आजी.

मी या येशूला सांगितलंय आज, आमच्या शाळेतलं हे भूत नाहीसं कर म्हणून ! "

एवढीशी, गोरीगोरी मिंकी, त्या उभ्या गवतात उभी होती. एकाग्रतेनं ती त्या क्रॉसकडे पाहात होती. त्या अंकलकडे पाहिलेल्या येशूला मोठ्या भक्तीनं आळवत होती. तिच्याकडे पाहून रावीला हसू येत होतं. रावी का हसते म्हणून मिंकीनं डोळे उघडले. आणि तिची नजर एका ठिकाणी स्थिरावली. तिथं काहीतरी चकाकत होतं. त्या तिथल्या गवतात मिंकीनं रावीचा हात धरला आणि ती धावत धावत तिथं निघाली. त्या गवतावरून.

मिंकी तिथं पोचली न् तिला एकदम नवल वाटलं. ती रावीला म्हणाली, " रावी ते बघ काय ! "

एवढंच बोलून ती थांबली नाही. तिनं तो चकचकीत कागद उचलला. ती चॉकलटची चांदी होती. कुणीतरी त्या मुलीच्या डब्यातलं चॉकलेट इथं खाल्लेलं होतं आणि तो कागद या गवतात टाकला होता. त्या कागदाला थोडंस चॉकलेटही चिकटलेलं होतं.

मिंकीनं तो कागद उचलला मात्र, रावी थरथर कापत राहिली. मिंकीला म्हणाली, " मिंके, चल ग लौकर. मला भीती वाटतेय. ते भूत इथंच कुठंतरी नक्की असणार. "

" मिंकी रावीला उत्तर न देता तो चॉकलेटचा कागद पाहात उभी होती. तो कागद ती उलटा सुलटा करीत होती. आणि मग तिनं रावीकडे वळून विचारलं, " रावी पूर्वी इथं असं गवत होतं का ग ? तू गेली दोन तीन वर्षं आहेस ना या आपल्या होस्टेलमध्ये ? "

" पूर्वीचं मला काय नाही बाई माहीत. पण मागच्या वर्षीसुद्धा एवढं गवत नव्हतं इथं. मोठ्या बाईंची ज्ञानू माळ्याला खरं म्हणजे सक्त ताकीद आहे, गवत वाढू द्यायचं नाही अशी. पण अलीकडे या ढंगाळेबाई

आल्यापासून हा ज्ञानू मुळी मोठ्या आईचं फारसं ऐकतच नाही. मला फार राग येतो त्याचा."

मिंकी, रावीचं बोलणं नुसतंच ऐकत होती. पण तिच्या चिमुकल्या डोक्यात विचारांची आणि शंकांची नुसती गर्दी उडाली होती. ते भूत या इथंच जवळपास कुठंतरी मुक्काम ठोकून असावं हे खास. आज इथं आलो हे फार बरं झालं. काल रात्री ती बाथरूमला गेली होती, नेहमी-सारखीच एकटी; चक्क काळोखातच. तिच्या हातात तिची एवढी-शीशी बॅटरी होती. ती बाथरूममधून बाहेर आली आणि तिनं सहज खिडकीतून बाहेर पाहिलं. कुणीतरी त्यांच्या इमारतीकडे येत होतं. ती खिडकीशी गेली, ते कुणीतरी नाहीसंच झालं होतं. तिला क्षणभर काय करावं कळेना. या खिडकीतून वर यायला काही वाट नव्हती. मग कुणीतरी या खिडकीपर्यंत येऊन कुठं गुप्त झालं? तिला वाटलं, जाऊन ज्ञानू माळ्याला उठवावं. पण तिनं तो बेत बदलला. ज्ञानूसुद्धा अलीकडे उगाचच तिच्यावर रागावत असतो. आता त्याला उठवलं तर तो तसाच पुन्हा रागावेल, तिला काहीतरी बोलेल आणि मग सुनीलाला हसायला तेवढंच कारण सापडेल.

मिंकीनं ज्ञानूला उठवण्याचा आपला बेत बदलला आणि ती एकटीच मग मागच्या छोट्याशा गॅलरीत गेली. या गॅलरीतून मुली कधीच फारशा येत नसत. कारण मागे ते स्मशान होतं. त्या स्मशानाची सर्वच मुलींना भीती वाटत होती. मिंकी मागच्या गॅलरीत आली आणि तिनं सहजच मागच्या स्मशानाकडे पाहिलं. काळोखात पांढरे पांढरे क्रॉस काही तिला नीटसे दिसले नव्हते, पण त्या क्रॉसपाशी कुणीतरी उभं आहे असं तिला वाटलं. मग ती आणखी लक्ष देऊन पाहात राहिली. त्या गवतात कुणीतरी वावरतंय असा तिला भास झाला. मिंकी कितीही धीट असली तरी त्या मध्यरात्री, त्या स्मशानात कुणीतरी आहे, काहीतरी करतंय हे

ध्यानी येताच तिच्या अंगावर सर्रकन् काटा आला. ती आत येऊन आपल्या कॉटवर निजली. मनात मात्र एक नक्की ठरवलं होतं तिनं, काही झालं तरी उद्या या मागच्या बाजूला एकदा फेरफटका मारायचाच.

आणि त्याप्रमाणे ती रावीला घेऊन इकडे आली होती. भूत इथंच आहे हे तिला आता समजलं होतं. आणि तरीही तिला राहून राहून एकेका गोष्टीचं नवल वाटत होत. त्या भुतानं बेबीच्या फ्रॉकची फाडलेली चिंधी या इथं गवतात आणून टाकलेली होती. त्या चिंधीला लाडवाचा वास अजूनही येत होता. हे भूत लाडू खात होतं. चॉकलेट खात होतं. भुताबद्दल तिनं असलं काही ऐकलं नव्हतं. तिच्या मैत्रिणींनी ज्या गोष्टी सांगितल्या होत्या, त्या सर्व गोष्टीतलं भूत माणसं खात होतं. माणसं जागी असली तरी ते त्यांना दिसतं. कधी कधी तर ते माणसांशी बोलतही होतं.

पण मिंकीच्या होस्टेलमधल्या या भुताची सगळीच तऱ्हा काही वेगळीच होती. मिंकीला हे सगळंचं अजब, नवलाचं वाटत होतं. रावी आपला हात सोडून निघून गेलीय याचं भानसुद्धा मिंकीला उरलेलं नव्हतं. ती एकटीच त्या वाढलेल्या गवतातून चालतचालत निघाली होती. गवत बाजूला सारून सारून ती खाली पाहात होती. पण त्या गवतात तिला तसं फारसं महत्त्वाचं काही मिळत नव्हतं. एकदा मिळाला एक रुमाल. तसाच चिंध्या केलेला. मग एक हेअर पीन. चावलेली. बिस्किटाच्या पुड्यांचे कागद. कुठं पुठ्ठयाचे डबे.

छे! या गोष्टीत काहीच अर्थ नव्हता. चोऱ्या तर भुतानं खूपच केलेल्या होत्या. कुणाची सोन्याची साखळी, कुणाचं पेन, कुणाचं घड्याळ, कुणाचं काय तर कुणाचं काय. या असल्या चॉकलेटं–बिस्किटांच्या चोरीचं मिंकीला फारसं काही वाटलं नव्हतं. तिच्या आजीनं एकदा तिला पत्रात लिहिलेलं होतं, "मिंकी, आपल्याला मिळालेला खाऊ

सर्वांना वाटावा. सर्वांनी सारखा खावा. एक तीळ सात भावात कसा वाटून खात होते ते भाऊ, ही गोष्ट मी तुला सांगितली आहे. खरं ना? गोष्टी ऐकायच्या असतात, वाचायच्या असतात त्या लक्षात ठेवण्यासाठी. त्यांच्याकडून काहीतरी शिकण्यासाठी. सर्वांना सारखं मिळालं म्हणजे कुणाला चोरी करायची इच्छा होणारच नाही. ही गोळ्या—बिस्किटं चोरीला जातात याचं तू फारसं मनावर घेऊ नकोस. तुला शक्य असेल तेवढी बिस्किटं, गोळ्या सर्वांना देत जा. एकटं काहीही खाऊ नकोस. आपल्याला जे मिळतं सर्वांना द्यावं."

मिंकी ते खरोखरच विसरली नव्हती. एकदा वाचलेली गोष्ट मिंकी कधीच विसरत नव्हती. गवतातून पुढं पुढं जात असताना तिला किती तरी गोष्टी आठवत होत्या. ती गवतातून चालत चालत पार दुसऱ्या टोकाला आली. तिथं एक पडकं घर होतं. आणि त्या घराशी टॉमी उभा होता. तिच्याकडे पाहून शेपटी हालवीत होता.

## सात

गेल्या सात-आठ दिवसांत मिंकीचं सगळं वागणंच बदललं होतं. पूर्वी कशाला न भिणारी मिंकी आता सगळ्याच गोष्टींना भीत होती. सारखी झोपून राहात होती. वर्गातही कुणाशी फारशी बोलत नव्हती. एकदा तर मोठ्या बाईंनी मुद्दाम तिलाच वर्गात एक गोष्ट सांगायला हाक मारली. पण बाईंना कधीही नाही न म्हणणारी मिंकी त्या दिवशी रडत रडत बाईंना म्हणाली, " मला नाही येत गोष्ट ! माझा घसा दुखतोय, फार दुखतोय. "

" बरं, बरं ! म्हणत बाईंनी तिला जागेवर बसायची परवानगी दिली.

पण मुलींना मात्र मिंकीचं भारी नवल वाटायचं. मिंकी हल्ली असं का करते तेच त्यांना कळत नव्हतं. मग कुणीतरी म्हणाली होती, " मिंकी भुताचा शोध लावायचा म्हणत होती ना, म्हणूनच भुतानं धरली तिला. भूत लागलं तिला."

मिंकी मग थरथरत म्हणायची, " होय ग ! आता नाही मी पुन्हा कधीसुद्धा भुताच्या गोष्टी करणार नाही. त्याचं नावसुद्धा घेणार नाही. म्हणून तर मी हल्ली कुणाशी बोलत नाही. खेळत नाही."

उषासुद्धा म्हणायची, " बिच्चारी मिंकी ! कसं धरलंय तिला भुतानं पाहिलंत ना ? आपण नाही ग बाई आता कसल्या भानगडीत पडणार. कुठली शिवाजी आणि कुठली तानाजी ! आम्ही आपल्या त्याच. एक मिंकी आणि एक उषा. आता ते सगळं विसरूनच जायचं."

हे असं दोघीही बोलत होत्या. आणि दोघी जरासुद्धा एकमेकीला सोडत नव्हत्या. एकदा शाळा सुटली की, एकेकीला जशा घट्ट धरून बसत होत्या. कुणी विचारलं तर मिंकी नुसतंच रडवेलं तोंड करीत होती. आणि उषा कळवळून म्हणत होती, " अग या मिंकीला किनई फार म्हणजे फारच भीती वाटतेय. म्हणून मग मी तिला सोबत करते. कारण त्या भुतानं मलासुद्धा पछाडलंच की ग !"

भुतानं पछाडलेल्या त्या दोन मुलींच्याकडे मग इतर साऱ्या थोड्या दुरूनच पाहात होत्या. मधली सुट्टी लागली की वसतीगृहातल्या या मुलींना जेवायला जावे लागे. पलीकडे या दोघीच एका बाजूला बसत. पूर्वी मिंकी जेवताना गमतीजमती करी. नकला करी. मुलींना हसवे. पण आता ते सारं मिंकी जणू विसरली होती. जेवतानाही ती एकटीच मुकाट्यानं जेवत राही. सुनीला तिला म्हणे, " मिंके खरंच का ग तुला भुतानं धरलंय ?"

सुनीलाच्या या प्रश्नावरही मिंकी ओठ आवळून गप्प बसे. मग

सुनीला चिडे. म्हणे, "एवढं काय झालंय ग अगदी गप्प व्हायला. भारीच करते ही! खाल्लंच पाहिजे हिला एकदा त्या भुतानं."

सुनीलाचं असलं बोलणं ऐकलं की दुसऱ्याच मुली चिडत. पण मिंकी मात्र चेहऱ्यावरची एक रेषही न हालवता मख्ख बसून राही. उषा तिच्याकडे आणि ती उषाकडे पाहात बसत.

मिंकीनं आणखी एक उद्योग आरंभला होता. ती रात्रभर बसून राहायची. जागं राहावं म्हणून. तिला जागं राहून काय काय होतं ते पाहायचं होतं. कोण केव्हा उठतं, कोण केव्हा झोपतं, कुठं जातं हे सारं तिला पाहायचं होतं. तिनं तसं उषाच्याही कानात सांगून ठेवलं होतं. अगदी बजावून सांगितलं होतं.

आणखीही पुष्कळ गोष्टी तिनं उषाच्या कानात सांगितल्या होत्या. एकदा तिला वाटलं होतं, हे सारं कुणालाच न सांगता विसरून जावं. उगाच नसत्या भानगडीत आपण पडूच नाही.

पण तसंही तिला बसवत नव्हतं. तिचा मामा मोठा पोलीस अधिकारी होता. तो कधी कधी तिला खूप वेगवेगळ्या गोष्टी सांगे. त्यात त्यांना अनेक गुन्ह्यांचा शोध अशाच काही छोट्या मुलांच्यामुळे लागे. मग मुख्यमंत्री त्यांना मोठी बक्षीसं देत. सरकार त्यांचा गौरव करी. लहान मुलांची ही कामं म्हणजे मोठी देशसेवाच आहे असं पंतप्रधान म्हणत. एकदा मामाबरोबर ती अशा एका समारंभालाही गेलेली होती. आणि ते सारं पाहून भारावली होती. संधी मिळाली तर आपणही असा काहीतरी पराक्रम करावा, पंतप्रधानांच्या हस्ते बक्षीस मिळवावं असं तिला फार फार वाटलं होतं.

आणि आता तिला तशी संधी मिळणार होती. तिनं जे पाहिलं होतं ते तसंच महत्वाचं होतं. ते नक्की काय आहे ते फक्त तिला पाहायचं होतं. त्यासाठी तिला उषाची मदत हवी होती. तिनं आणि उषानं



मिळून एक कट रचला होता, आणि त्यासाठी मिंकीनं हे सारं नाटक चालवलं होतं.

त्या दिवशी ती त्या गवतातून पुढे पुढे निघाली होती. जाता जाता वाटेत तिला कितीतरी ओळखीच्या गोष्टी दिसल्या होत्या. अगदी मोडक्या तोडक्या अवस्थेत पडलेल्या त्या वस्तू तिनं ओळखल्या होत्या.

त्या वस्तूंचे ते अवशेष तिनं गोळा करून घेतले होते. त्यावेळी आपण हे का गोळा करतोय हे तिचं तिलाही धड कळत नव्हतं. ती पुढे गेली होती आणि एका पडक्या घरापाशी तिला टॉमी दिसला होता. तिला पाहून त्यानं ओळखीची शेपटी हालवली. तिलाही टॉमीला तिथं पाहून थोडं नवल वाटलं होतं. टॉमी हा कुत्रा होता, तो कुठंही भटकत होता. हे जरी खरे असलं तरी इथं टॉमीला चक्क साखळीनं बांधून ठेवलेलं होतं. म्हणजे मुद्दाम ! या घराची राखण करण्यासाठी. एका पडक्या घराची राखण टॉमी करीत असलेला पाहून मिंकीला नवल वाटलं होतं. ती पुढे गेली होती आणि टॉमीला थोपटून म्हणाली होती, "टॉम्या अरे तू काय करतो आहेस रे इथं ? कुणी बांधून ठेवलंय तुला ?"

आणि टॉमीनं तिच्या अंगावर उड्या मारून कुंऽकूं आवाज केला होता. मिंकीला वाटलं त्याला सोडावं, पण त्याच्या साखळीला कुलूप होतं. म्हणजे टॉमी सुटून जाऊ नये असा बांधणाराचा उद्देश होता. मिंकी थोडावेळ तिथंच उभी राहिली. इकडं तिकडं पाहात. आणि तिची नजर सहज त्या पडक्या घराच्या वर गेली. त्या घराच्या छपरावर कसला तरी कागद वरून खाली येत होता. कुणी मुद्दाम टाकावा असा. मिंकी त्या कागदाकडे पाहात राहिली. खाली येताना तो दगडाला बांधलेला तिला स्पष्ट दिसला. तो कागद नीट जागी पडावा म्हणून कुणी त्याला दगड बांधला होता. ती जशी आवळा पाडायला लिंडोर करायची तसा. तो कागद घेऊन ती त्या घराच्या मागच्या बाजूला गेला. मिंकी क्षणभर विचारत पडली. त्या बाजूला जावं का नाही ? त्या बाजूला तर दगडच दगड पडलेले होते. मिंकीला त्या कागदावर काय लिहिलं असेल हे पाहाण्याची उत्सुकता स्वस्थ राहू देईना. ती तशीच त्या दगडातून वाट काढीत निघाली. मागच्या बाजूला आली. तिनं तो कागद शोधून काढला त्या कागदावर कसल्या तरी खुणा होत्या. कसल्या होत्या ते तिला कळलं

नाही. पण मिंकीचं डोकं तसं मोठं तल्लख होतं. तिनं आपल्या खिशातून कागद पेन्सील काढली आणि तशाच खुणा आपल्या कागदावर केल्या. मग तिनं तो कागद पुन्हा नीट होता तसा ठेवला. आणि ठेवता ठेवता झटकन् तिच्या ध्यानी आलं. त्या खुणांखाली तारीख होती. आजचीच. मग त्या खुणांचा तिनं अर्थ लावायचा प्रयत्न केला. प्रयत्न करूनही काही साध्य होईना तशी ती कंटाळली. तिनं इकडं तिकडं पाहात एक गोल फेरी त्या घराला मारली. आणि असं पाहाता पाहाता ती दचकली. त्या पडक्या घरात तिला काहीतरी चकाकताना दिसलं. ती त्या घराच्या खिडकीत चढली. तिनं डोकावून पाहिलं. तिथं एक छानपैकी सोन्याचं बिस्कीट पडलं होतं. आणखीही बराचसा माल दिसत होता. असलंच सोन्याचं बिस्कीट एकदा तिच्या मामानं आणलं होतं. तिच्या आजीला दाखवायला.

मिंकीनं ते सारं पाहिलं होतं. त्या घरात खूपच काहीतरी साठवलेलं असणार असं तिला वाटलं. पण मग शाळेच्या भुताटकीचा आणि याचा संबंध काय ? हा ज्ञानूचा टॉमी इथं कसा ? मिंकीच्या डोक्यात प्रश्नांची गर्दी उडाली. तिला आता शाळेत जायचं होतं. पुन्हा त्या गवतातून जायचं म्हणजे कठीणच होतं. मिंकी एका लहानशा पायवाटेनं निघाली. ती वाट एवढी लहान होती की, त्या गवतात ती आहे असं कुणालासुद्धा कळलं नसतं. पण मिंकी नेमकी त्या वाटेसमोरच उभी होती म्हणून तिला ती दिसली होती. नाही तर त्या गवतातूनच जाणं तिला भाग होतं.

त्या लपलेल्या वाटेवरनं मिंकी निघाली होती. ती वाट कुठे जातेय हे काही तिला कळत नव्हतं. ती बराच वेळ चालत होती. न भिणाऱ्या मिंकीलाही आता थोडी भीती वाटली. कारण त्या वाटेवर कुणाचे तरी मोठेमोठे पाय उठले होते. हे पाय उलटे नव्हते. पण तरीही ते खूपच

मोठे होते. राक्षसाला शोभण्यासारखे.

मिंकी त्या पायांच्याकडे पाहात पाहात निघाली. ती वाट संपली न् तिला नवल वाटलं. ती नेमकी ढंगाळेबाईंच्या घराच्या मागे उभी होती. बाईंनी घरामागे छानच बाग केलेली होती. मिंकीला वाटलं बाईंना हाक मारावी आणि आपण कुठून कशा आलो ते सांगावं. तिनं तोंड उघडलंही, आणि तेवढ्यात तिला ज्ञानूचा आवाज आला. ज्ञानू म्हणत होता, " टाम्याला ठिवलाय मी बांधून पक्का. कुलूप घालूनशान. "

" नीट सगळं करायला हवंय बघ ज्ञानू ! हे सगळं छान चाललं तर तुझी न् माझी जन्माची ददात मिटेल. "

" काय काळजी--घोर करू नका. मी एकदा शबूद दिला की दिला. त्या पोरींना सोबतबी होते टॉमीची, न् आपलंबी काम होतं. काय काय भानगडी ऐकू येतात बघा पोरींच्या. "

" पोरींचं जाऊ दे रे. मी सांगते ते ऐक. बरं झालं तू ते पडकं घर दाखवलंस ते. माझ्या भावाला ते एकदम पसंत पडलं. आता आपलं काम सोपं झालंय. या नोकरीत काही दम नाही बघ. "

मिंकीला त्या बोलण्याचा नीटसा उमज पडत नव्हता. पण हे सारं बोलणं त्या पडक्या घराबद्दल काही तरी आहे एवढं मात्र तिला समजलं होतं. तिला आणखीही काही ऐकावं असं वाटत होतं, पण तिनं मन आवरलं. ती ढंगाळेबाईंच्या घराच्या मागच्या बाजूनं तशीच पुढे निघाली न् आपल्या वसतीगृहात आली. जे ऐकलं, जे पाहिलं, ते सारं मनाशी आठवीत.

आजच्या एका दिवसात मिंकीनं खूपसं काही पाहिलेलं होतं. तिच्या मनात त्याची नुसती गर्दी उडाली होती. हे सारं कुणाला तरी सांगावं असं तिला सारखं वाटत होतं. रावीला सांगावं का ? पण क्षणात तिनं आपला तो विचार बदलला. रावी मित्री आहे. आपल्याला तिथं एकटीच

टाकून पळाली. सुनीलाला तर सांगण्यात काहीच अर्थ नव्हता. तिच्यावर विश्वास टाकावा आणि तिनं सगळ्या मुलींना काय हवं ते सांगावं असं नेहमीच होत होतं. बेबी तर बिचारी अगदीच लहान होती. तिला विश्वासाची आणि खात्रीची एकच मैत्रीण दिसत होती. जी स्वतःला तानाजी समजत होती ती. तिला वाटलं आता याक्षणी उषाकडे धावत जावं आणि तिला घडाघडा सारं सांगावं.

परंतु मिंकीला एक गोष्ट माहीत होती. एखादी महत्वाची गोष्ट बोलायची असेल तर तिची आई, तिची आजी, तिचे पप्पा, तिचा मामा ही सारीच मोठी माणसे, निवांतपणानी बोलतात. हळूहळू बोलतात. इतकं हळू की, पुष्कळ वेळा मिंकी अगदी जवळ लुडबूडत असली तरी तिला ते ऐकू येत नसायचं. काहीसुद्धा समजत नसायचं.

आपल्याला तसा निवांतपणा कधी मिळतो याची मिंकी वाट पाहात होती. तशी संधी तिला पहाटे मिळाली. ती आणि उषा एकदमच उठल्या. तोंड धुवायला खाली बागेत गेल्या. दवानं भिजलेल्या गवतातून फिरायला मिंकीला फार आवडायचं. अशीच ती पहाटे त्या गवतावरून फिरत होती. आणि वरून उषा आली. उषानंच आपला ब्रश तोंडात असतांनाच विचारलं, " मिंऽके तू काल स्मशानात गेली होतीस ? तिऽथं–भू—काय दिसलं ग तिथं ? "

मिंकीला उषाचं हसू आलं. तिच्या तोंडातला ब्रश काढून घेत ती म्हणाली, " आधी तोंड धू. मग सांगते. खूप मऽजा आहे. "

उषानं गडबडीनं तोंड धुतलं आणि त्या मागच्या बाजूला जाऊन बसल्या. ही त्यांची आवडती गुप्त जागा होती. भुताला पकडण्याचे त्यांचे कितीतरी बेत इथंच झालेले होते.

आणि मग मिंकीनं तिला हळूहळू सगळं सांगितलं होतं. आपण काय पाहिलं, कसं पाहिलं, काय काय ऐकलं हे सारं सांगून तिनं

आपल्या खिशातून गोळा केलेली एकेक गोष्ट बाहेर काढली. ती सारी दौलत तिनं अजून खिशातच ठेवलेली होती. नंतर तिनं तो कागदही उषाला दाखवला. म्हणाली, ' अग विमान येतं ना खाली, तसा तो खाली खाली येत होता. आणि कसा नेमका दगडांच्या राशीतच पडला. "

" कागद टाकताना तुला कुणी दिसलं नाही? एखादं विमान? निदान एखादा पक्षी? म्हणजे बघ पुष्कळ लोक कबूतरांना हे असं निरोप पाठवायचं शिक्षण देतात म्हणे. नाही पाहिलंस काही? "

" नाही ग! " मिंकीनं निराशेनं म्हटलं.

खरंच तिनं विमान किंवा एखादा पक्षी पाहिलेला नव्हता. तिला प्रथम दिसला होता तो दगडच. खाली गरगरत येणारा. नाही नाही आधी कागद दिसला होता आणि मग दगड. सांगण्यात अशी गल्लत होणं खरं नव्हतं. तिनं पुन्हा नीट तपशीलवार सारं सांगितलं आणि उषानं पुन्हा नीट सारं ऐकून घेतलं. अगदी मन लावून.

मग त्यांनी प्रथम तो खुणेचा कागद मिंकीच्या मामाला पाठवायचं ठरवून टाकलं. नाष्टा झाला की अभ्यासाच्या वेळात मिंकी पत्र लिहिणार होती. मामालाच. आजीला यावेळी काही लिहिण्यात, काही सांगण्यात अर्थ नव्हता. ती मिंकीला रागवली असती. म्हणाली असती, " या पोरीपुढं तर अगदी हद्द झाली ग बाई! हिचा म्हणजे कुठंतरी काहीतरी घोळ ठरलेला, नको तिथं डोकं चालतं हिचं."

एवढंच बोलून आजी थांबली नसती. ती तरातरा शाळेत आली असती, बाईंच्या समोर नको ते बोलली असती आणि सगळाच गोंधळ उडाला असता. मिंकीची सारी मेहनत फुकट गेली असती.

म्हणूनच उषानं आणि तिनं नीट विचार करून सारं काही ठरवलं होतं. ठरल्याप्रमाणे मिंकीनं मामाला पत्र लिहून त्यात तो खुणेचा कागद तिनं टाकला होता. तिनं लिहिलं होतं, " मामा हा कागद आहे ना,

त्यावर ज्या खुणा आहेत ना, तशाच त्या कागदावर होत्या. मी त्यांची कॉपी केलीय. आणि मामा तिथं एक सोन्याचं बिस्कीट दिसलं. उषा म्हणते, सोन्याचं बिस्कीट असं पडणार नाही. तो नुसताच कागद असेल. काही का असेना, इतके दिवस नुसतं भूतच होतं आता राक्षसही आलेला दिसतोय. आमच्या शाळेची या दोघांच्या तावडीतून सुटका कर. लौकर ये."

मिंकीनं ते पत्र बंद करून वर्गातल्या एका मैत्रिणी जवळ टाकायला दिलं. तिला तसं नाहीत्या वेळी बाहेर जाता येत नव्हतं आणि ती गेली असती तर ती कां गेली, कुठं गेली हे सारं सर्वांना समजलं असतं. उषानं तिला बजावलं होतं. म्हणाली होती, "हे बघ मिंकी, आता जरा सावधपणानं वागायचं. कुणाशी बोलायचं नाही. आपण फार भ्यायलोय असं दाखवायचं-"

"का ग? भीती वाटत नसली तरी वाटते म्हणायचं? आणि मग या सुनीला बिनीला हसल्या मग?"

"हसू देत. पण आपण असं भ्यायल्यासारखं दाखवलं म्हणजे मग आपलं काम सोपं होईल. कुणाचंच आपल्याकडे लक्ष जाणार नाही. आपण कुठं जातोय, काय करतोय हे कुणाला कळणार नाही असं वागायला हवंय आपल्याला."

उषाचं सगळं बोलणं मिंकीनं नीट ध्यानी घेतलं होतं आणि ती त्याप्रमाणे वागत होती. कधी न घाबरणारी मिंकी आता सर्वच गोष्टींना घाबरत होती. रात्री उठली तर उषाला उठवीत होती. कधी कधी सुनीला म्हणायची, "या मिंकीला बाथरूमपर्यंत जायला भीती वाटते आणि उषाच्या कॉटपर्यंत कशी ग एकटी जातेस काळोखातून? तेव्हा नाही वाटतं भीती वाटत?"

"अग बाथरूमच्या बाजूलाच एकदा तिला ते भूत दिसलं होतं ना,

म्हणून घाबरते ती एकटी जायला."

मिंकी ऐवजीं उषाच उत्तर द्यायची. उषाच्या हुषारीचं मिंकीला खूप नवल वाटायचं. कधी कधी तिला वाटायचं, आपल्यापेक्षा ही उषाच जास्त हुषार आहे. तिला एकदा ते पडकं घर दाखवायलाच हवं.

पण अजून तिला तशी संधी मिळाली नव्हती. त्या दोघी एका बाजूला जाऊन बसल्या तरी कुणीतरी त्यांच्या जवळ येत होतं. त्या अशा का बसल्या म्हणून विचारीत होतं. नसत्या चौकशा करीत होतं.

मिंकीनं मामाला पत्र पाठवूनही आता आठदहा दिवस झाले होते. ती रोज त्याच्या उत्तराची वाट पाहात होती. ज्या मैत्रिणीजवळ तिनं पत्र टाकायला दिलं होतं, तिला ती रोज विचारीत होती, " तू पत्र नीट टाकलंस ना ? अगदी नक्की ? त्या लाल पेटीतच टाकलंस ना ? "

आणि ती मैत्रीण तिला म्हणत होती, " अगदी त्या लाल पेटीतच टाकलं. तुझ्या गळ्याची शपथ."

मैत्रिणीनं अशी शपथ घेतली की मिंकीला खात्री पटत होती. मग ती रोज मामाच्या पत्राची वाट पाहात राहायची. पण एवढे दिवस झाले तरी तिला मामाकडून काहीच कळत नव्हतं. इकडे अजूनही लहान-सहान चोऱ्या होतच होत्या. पण मिंकीला त्या पडक्या घरात काय भानगड दडली आहे ते पाहायचं होतं. त्याचीच तिला उत्सुकता लागली होती. उषाला ते घर कधी एकदा दाखवते असंही तिला झालं होतं. ती तशा संधीची वाट पाहात होती.

आणि एक दिवस तिला तशी संधी मिळाली. त्या दिवशी शाळेला अचानक सुट्टी मिळाली. शाळेच्या संस्थापकांपैकी कुणीतरी वारलं. मोठ्या बाईंनी त्यांची सगळी माहिती सांगितली. त्यांची थोरवी वर्णन केली आणि मग त्या सगळ्या मुलींनी दोन मिनिटं गपचूप, न हालता उभं राहून त्या श्रद्धांजली वाहिली. मिंकी सारं ऐकत होती, डोळे मिटून

उभीही राहिली होती. पण तिच्या मनात विचार मात्र चालू होते त्या पडक्या घराचे. आज अशी अचानक सुट्टी मिळाली होती. मुली त्या आनंदातच दंग होत्या. आज शुक्रवार होता. उद्या शनिवार म्हणजे सुट्टी, आणि रविवारची तर सुट्टी होतीच. म्हणजे कुणी कुणी गावातल्या आपल्या नातेवाईकांच्या घरी जाणार होत्या. त्या गर्दीत त्या दोघी कुठं हळूच निसटल्या असत्या तरी कुणाला फारसं कळणार नव्हतं. उषाला आपल्या मनातला हा बेत कधी एकदा सांगते असं मिंकीला झालं होतं. आपल्या जागेवर बसून ती उषाची वाट पाहात होती. या चिंचेच्या पारामागे सहसा कुणी येत नव्हतं. इथंच मिंकीनं प्रथम ते भूत पाहिलेलं होतं. त्यामुळे सर्वच मुलींनी या जागेची दहशत घेतली होती. गपचूप, कुणाला न सांगता येऊन बसत होत्या फक्त त्या दोघीच. उषा आणि मिंकी.

ती उषाची वाट पहात त्या पारामागे उभी राहिली न् थोड्याच वेळात उषा तिथं आली. म्हणाली, "वाटलंच होतं मला तू इथं येऊन माझी वाट पाहात असशील. चल आज जाऊ या तिकडं."

आपल्याच मनातलं नेमकं उषाला कसं समजलं याचं मिंकीला नवल वाटलं. तिनं उषाचा हात धरला न् ती भराभर त्या गवतात शिरली. वेळ भर दुपारची होती. पण मिंकीला उन्हाची मुळीच पर्वा नव्हती. तिचं सारं लक्ष त्या पडक्या घराकडे लागलं होतं.

त्या दोघींना ते घर दिसलं. पण त्या तिथंच थबकल्या. घरापासून पुष्कळ दूर. कारण त्या घरात शिरताना त्या दोघींनी ज्ञानूला चक्क पाहिलं होतं. ज्ञानू घरात शिरला आणि त्यानं पटकन् दार लावून घेतलं. मिंकी उषाच्या कानात कुजबुजली, "काय ग, याचा टॉमी नाही ना कुठं? तो असला तर आपल्या मागे येईल. आणि आपण ज्ञानूला दिसू."

उषानं इकडे तिकडे पाहिलं. ती म्हणाली, " नाही. तो बघ टॉमी, ढंगाळेबाईंच्या दारात बांधलेला दिसतोय. आता आपण असं या गवतात बसत बसत पुढं जाऊ या. बघू या तरी ज्ञानू काय करतोय ते. "

त्या दोघी त्या गवतात लपल्या. ते काँग्रेस गवत चांगलं तीनचार फूट वाढलेलं होतं. त्या गवतात मिंकी आणि उषा सहज लपल्या गेल्या. त्यांच्या अंगाला गवतासारखे किडे चावत होते. कुठं कुठं अंगावर काट्यांचे ओरखडे उठत होते. पण तिकडे लक्ष द्यायला कुणालाच सवड नव्हती. त्या बसत बसत पुढे निघाल्या होत्या. हळू हळू बोलत बोलत.

त्या गवतातूनच त्या पुढे झाल्या. त्यांना आतलं काहीच दिसत नव्हतं. ज्ञानू आत काय करतोय, आत असं आहे तरी काय हे सारं त्यांना पाहायचं होतं. मिंकी उषाला म्हणाली, " उषा मला झाडावर चढता येतं. मी अशीच हळूहळू त्या झाडापर्यंत जाते. तू इथंच बैस. कुणी आलं तर मला सांग. "

" तुला सांगू ? आणि ते कसं ? मी ओरडले तर कुणाला कळणार नाही का ? म्हणजे आयतीच मी त्यांच्या तावडीत सापडायची. "

" मग ? " मिंकीनं थोडावेळ विचार केला. न् मग एकदम टाळी वाजवून ती म्हणाली, " उषा, आपल्या रावीच्या वाढदिवसाला तू नक्कल केली होतीस. तुला मांजराचा आवाज छान काढता येतो. तसा काढतेस ? तू म्यॉंव, म्यॉंव केलंस की मी समजेन काय समजायचं ते. आणि हे बघ, तसं कुणी तुला दिसलं ना तर तू आपली अशीच लपत-छपत परत जा. "

" आणि तू ? तुला टाकून ? "

" माझी नको काळजी करूस. मी येईन कशीतरी. सर्वांना चकवून. "

उषाला असं सांगून मिंकी तशीच बसत बसत झाडाकडे गेली आणि एखाद्या खारीसारखी सरसर झाडावर चढली. तिनं झाडावरून एकदा



चोहीकडे पाहिलं. तिची शाळा आणि तिचं होस्टेल यांच्या गच्च्या तिला अगदी स्पष्ट दिसत होत्या. तिच्या होस्टेलच्या गच्चीत ढंगाळे-बाई काहीतरी करीत होत्या. बाई एवढ्या उन्हात काय करताहेत हे तिला कळत नव्हतं. त्या झाडावरून तिला बाई तशा स्पष्ट दिसतहो नव्हत्या. पण त्या काहीतरी करीत होत्या हे नक्की.

बाईंच्या वरची नजर काढून तिनं त्या पडक्या घराकडे पाहिलं. त्या घराला वरच्या बाजूला खिडकी वगैरे काही नव्हतं. म्हणजे तिचं झाडावर चढणं फुकटच गेलं होतं. काय करावं तिला कळेना. घराच्या आसपास या एका लिंबाच्या झाडाखेरीज दुसरं झाडही नव्हतं. उतरावं आणि सरळ उषाकडे जाऊन होस्टेलवर परतावं असं तिच्या मनातही आलं. एक पाय तिनं खाली सोडलाही. आणि तेवढ्यात तिला आवाज ऐकू आला. म्यॉव ! म्यॉव ! कुणीतरी आलं होतं. मिंकी झाडाच्या फांदीवरच आडवी झाली.

## आठ

दिवाळीच्या सुट्टीत मिंकी घरी गेली, तरी तिला तो विषय बोलायला पुरत होता. ती सारखे तेच ते सर्वांना सांगत होती. अखेर आजी तिला म्हणालीही, " अग पुरे, कितीवेळा तेच ते सांगशील ? कंटाळा नाही का येत तुला ! "

" कंटाळा ? अग आजी इतकी गंमत झाली बघ त्यावेळी. मी अशी झाडावर बसले होते आणि— "

आजीला सारं सांगता सांगता मिंकीला ते अगदी आत्ता घडतंय असं वाटत राहायचं. अशी काही एकूण धमाल येईल याची तिला मुळीच कल्पना नव्हती. आठवण आली तरी तिला हसू यायचं. मग ती एकटीच खो खो हसत राहायची. ताई चिडून म्हणायची, " ए अशी खुळ्यासारखी हसू नकोस. काय एकेक वेडे चाळे करीत असतेस ग ! आजी हिला खरंच उगाचच होस्टेलला पाठवलीय. शहाणी होण्याऐवजी वेडीच होऊन आलीय चारसहा महिन्यांत. "

“ पाच महिने. पूर्ण पाच महिने आणि अठरा दिवस. हो किनई ग आजी ? काय काय मज्जा आली ग आजी त्यावेळी.”

“ झाली हिची रेकॉर्ड सुरू. आजी आता हिला मुळीच होस्टेलवर पाठवायचं नाही बघ.”

“ का ? का ग ? तुला रात्री सोबत हवी वाटतं ? ए आजी मी जाणार बरं का परत. मस्त वाटतं बघ तिकडं. भूत काय, राक्षस काय ! ए ताई तू असतीस ना तर तुझं हार्टफेलच झालं असतं एकेक प्रकार पाहून ! काय पण बनवाबनवी ! सगळा चारसोबीसचा मामला. पण आपण तर बुवा एकदम खूष आहोत ताई होस्टेलवर ! आणि आमच्या त्या ढगाळे-बाई ! ताई त्यांच्याकडे तू पाहिलं असतंस ना, तर तुझं हे रडूबाई-पण एकदम खलास झालं असतं. एवढी कडकलक्ष्मी पण एकदम मिकी-माऊस झाल्या.”

बोलता बोलता मिंकी पुन्हा हसत सुटली. खरोखरच सारखं मिंकीला हसू येत होतं. तिला स्वत:चीही गंमत वाटत होती आणि ती हसत होती. तिनं प्रथम भूत पाहिलं तो पावसाचा दिवस तिला आठवला. ह्यॅ ! अगदीच बावळटपणा झाला तो. एका काळ्या पांढुरक्या ढगाला आपण भूत समजलो. आणि ते पाय ?

मिंकी पुन:पुन्हा हसत होती आणि सारं आठवीत होती. दोनचार मुलांचे पाय एकत्र झाले होते, आणि चिखलानं उमटलेल्या त्या आकृतीला ती भुताचा पाय समजली होती. कमालच केली आपण ! चित्र काय काढली, मुलींना काय वाटली. सगळाच वेडेपणा. आणि तरी मोठ्या बाई म्हणाल्या, “ मिंकी तू फार हुषार आहेस हं ! तुझ्यामुळे आज कितीतरी गोष्टी उघडकीला आल्या.”

मोठ्या बाईंची आठवण आली तशी मिंकी एकदम गंभीर झाली. त्यावेळी मोठ्या बाई बिचाऱ्या किती घाबरल्या होत्या. एवढे दिवस असा

काही प्रकार शाळेतल्या आवारात घडत असेल याची त्यांना मुळीच कल्पना नव्हती, त्यांना काय कुणालाच तशी कल्पना नव्हती आणि येणार तरी कशी ? ढगेबाईंच्यावर विश्वास ठेवून मोठ्या बाईंनी सगळं वसतीगृह त्यांच्या ताब्यात दिलं होतं. मोठ्या बाई मग आपल्या कधी-तरी येऊन चौकशी करीत होत्या. मुलींना काय हवं नको पाहात होत्या. आणि मुलींनी भुताची गोष्ट सांगताच त्या म्हणाल्या होत्या, 'अग असं भूत कधी असतं का ? भूत वगैरे खरं काहीही नसतं. तो निव्वळ आपल्या मनाचा भास असतो.'

"पण बाई आम्ही पाहिलंय. ते गच्चीत नाचतं. कधीकधी मध्यरात्री गाणंसुद्धा म्हणतं. कधी बोलतं, कधी हसतं."

"हो बाई हो ! ते नाचतं तेव्हा घुंगरांचा आवाज अगदी स्पष्ट ऐकू येतो. किती वेळा आम्ही ऐकलाय. आम्हाला भीती वाटते बाई. रात्री तर फारच भीती वाटते बघा."

मुलींनी असं म्हणताच बाईंनी ज्ञानू माळ्याला मुलींच्या सोबत झोपायला पाठवलं. पण तो ज्ञानूच बाईंच्यावर उलटला. त्यानं मुलींच्या मनातली भीती जास्तच वाढवली. तो उलट मुलींना जास्त जास्तच भुताच्या गोष्टी सांगत होता. मिंकीला भुताची भीती वाटत नव्हती तर तिला भीती वाटावी असं बोलत होता.

"काय पण फजिती झालीय ज्ञानूची !"

मिंकी स्वत:शीच बोलली. आणि गप्प बसली. तिला असं एकटीला बोलताना ताईनं ऐकलं असतं तर पुन्हा ताई तिला रागावली असती. काहीतरी बोलली असती.

पण ते खरं सारखं सारखं मिंकीला आठवावं असंच घडलं होतं. उपाला गवतातच सोडून मिंकी झाडावर चढली होती. ढंगाळे बाईंना तिनं वसतीगृहाच्या गच्चीत पाहिलं होतं. भर उन्हात बाई काय

करतात याचं तिला नवलही वाटलं होतं. पण ढंगाळेबाईंच्या पेक्षा तिचं सारं लक्ष लागलं होतं त्या पडक्या घराकडे. त्या घरात आत्ता ज्ञानू काय करतो आहे हे तिला पाहायचं होतं, पण तिला काहीच दिसत नव्हतं. आणि तेवढ्यात कुणीतरी आल्याचं मिंकीला उषानं म्याँव म्याँव असा आवाज काढून कळवलं होतं. मिंकी झाडावरच लपली होती. तिनं झाडावरूनच खाली पाहिलं होतं. त्या घराभोवती पाच सहा माणसे जमा झाली होती. ती दार ठोकीत होती.

ही एवढी माणसं या घरापाशी का जमली आहेत हे मिंकीला कळत नव्हतं. श्वास रोखून ती त्यांच्याकडे पाहात होती. त्यांच्यापैकी एकानं हाक दिली. " ज्ञानबा दार उघड. आम्ही तुझीच माणसं आहोत. बाईंनीच धाडलं आम्हाला. "

हे ऐकताच ज्ञानूनं पटकन् दार उघडलं होतं. तेवढ्यात पाहाता येईल ते पाहाण्याचा मिंकीनं प्रयत्न केला होता. खोके आणि पुठ्याचे गठ्ठे याखेरीज मिंकीला दुसरं फारसं काही दिसलं नव्हतं. भूत किंवा राक्षस असला कोणताच प्राणी आत नव्हता.

ते सारे आत गेले आणि ज्ञानूनं पुन्हा दार लावलं. आता शक्य तितक्या झटपट मिंकीला खाली उतरायला हवं होतं. उषा तर बहुतेक होस्टेलवर पोचलीच असणार. आता तिलाच कसंतरी एकदा होस्टेलवर पोहचायला हवं होतं. आणखी थोड्याच वेळात जेवणाची घंटा झाली असती आणि मिंकी नाही म्हणताना सगळाच गोंधळ झाला असता. ढंगाळेबाई तिच्यावर नक्कीच रागावल्या असत्या.

काय करावं, आणि कसं कुठच्या बाजूनं उतरावं याचा ती विचार करीत होती, आणि तेवढ्यात ती सारी माणसं बाहेर आली होती. त्यांच्या हातात त्यातली काही खोकी होती. आणि ज्ञानू त्यांना काही-तरी गयावया करून सांगत होता. शाळेकडे, वसतीगृहाकडे बोट

दाखवीत होता. मिंकी झाडावरून नीट निरखून पाहात होती. आणि बघता बघता तिला हसू फुटलं होतं. तिच्या मामानं वेष बदलला असला तरी तो तोच होता. नक्कीच. आणि मग मिंकी सरसर झाडावरून उतरली होती, आणि तिनं हाक मारली होती, " मामा ? अय्या तू कसा इकडे आलास ? "

मामानं मिंकीला पटकन् उचलूनच घेतली होती. ते पाहून ज्ञानू आणखीनच घाबरला होता. आणि म्हणाला होता, " ही ही पोरगी काहीतरीच बडबडते. भूत हाये म्हणते. "

" मग आहेच मुळी. ज्ञानू तूच तर सांगतोस, की इथं भूत आहे म्हणून. एकदा, बरं का मामा यानं आम्हाला पडक्या घरातल्या भुताची गोष्ट सांगितली होती. आणि एक दिवस मी सहज इथं आले ना, तर त्या गोष्टीतल्या सारखंच अगदी हुबेहुब असं घर दिसलं मला. मला वाटलं बघावं तरी भूत कसं असतं ते, म्हणून मी खिडकीतून पाहिलं तर भूत नव्हतंच हे असलं काहीतरी सामान होतं. आणि एक चकचकीत बिस्कीट होतं जसं काही सोन्याचंच होतं ते. "

मिंकी मोठ्या आवेशानं सगळं तपशीलवार सांगत होती. आणि मामा ऐकत होता. ज्ञानू चुळबुळ करीत होता. मामा मिंकीला म्हणाला, " मिंके हा कागद तू कशावरून कॉपी केलास ? "

" इकडे या दगडात एक कागद येऊन पडला. कुठून आला कळलं नाही. पण त्या कागदाला दगड बांधला होता. "

मामा हसला. त्यानं विचारले, " मिंकी, शाळेच्या गच्चीतून इकडे दगड टाकला तर इथं येईल की नाही ? काय वाटतं तुला ? "

" हात्तीच्या न यायला काय झालं रे ? सहजच येईल. "

" शाब्बास ! हुषार आहेस मोठी. "

असं म्हणून मामानं मिंकीचा हात धरला न् तो मिंकीच्या वसती-

गृहाकडे निघाला. ज्ञानूला मध्ये घेऊन बाकी सारे तिथंच त्या पडक्या घराकडेच थांबले होते. वाटेनं मिंकी मामाला भुताच्या सगळ्या गोष्टी सांगत होती. आपण परकर कसा शोधला आणि ढगाळेबाई कशा रागवल्या, सारं ती सांगत होती. आपण गवतात सापडलेल्या वस्तूसुद्धा कशा जपून ठेवल्या आहेत हेही मिंकीनं मामाला सांगितलं.

मामा मिंकीला घेऊन वसतीगृहात आला. त्यानं ढगेबाईंना बोलवून घेतलं. मिंकीनं पाहिलं, ढगेबाईचा चेहरा पांढरा फटफटीत पडला होता. त्या मिंकीकडे पाहातही नव्हत्या.

मामानं बाईंना ज्ञानू विषयी पुष्कळ प्रश्न विचारले. आणि बाईंनी त्याला उत्तरं दिली. बाईंच्या मते ज्ञानू मोठा प्रामाणिक आणि हुषार माणूस आहे. या मुलीच फार त्रास देतात. उगाचच कागाळ्या करतात. या वसतीगृहात फार पूर्वीपासूनच भुताटकीचे प्रकार घडताहेत वगैरे वगैरे. मामा विचारीत होता. आणि बाई उत्तरं देत होत्या. साऱ्या मुली चुपचाप उभ्या होत्या. काय प्रकार आहे हे त्यांना नीटसं कळत नव्हतं. पण मिंकी त्यात गोवली गेली आहे त्यावरून हा काहीतरी भुताटकीचा प्रकार आहे एवढं खास असं त्या म्हणत होत्या. एकमेकीशी डोळ्यांच्या खुणांनी बोलत होत्या.

मग मामानं सुनीलाला जवळ बोलावलं आधी सुनीला येतच नव्हती. मग मामा म्हणाला, " हे बघ सुनीला, तू सगळं नीट सांगितलंस तर ती आमच्या मिंकीची मोटार आहे ना तुझ्याकडे ती मी तुला बक्षीस द्यायला लावीन. "

" अय्या माझी मोटार ? तिच्याकडे कशी गेली ? आणि मामा ते तुला कस रे कळलं ? "

" हिच्या आईकडून, मामीकडून. हिला अशी सवय आहे, ती जावी, तिनं नीट अभ्यास करावा म्हणून चार वर्षांपूर्वी तिला इथं ठेवली. पण



ही न सुधारता, आणखीनच बिघडली. आणि बाई याला कारण तुम्ही आहात. तिची ही खोड, वाईट सवय दूर करण्याऐवजी तुम्ही तिचा फायदा उठवला. त्या पोरीकडून बारीकसारीक चोऱ्या करून घेतल्यात. त्याबद्दल तिला काय दिलंत, तर कुठं रुमाल, कुठं जास्तकमी खायला. बस्स ! बाई सारं उघडकीला आलंय, आता नीट कबुली द्या. ”

साऱ्या मुली ऐकून स्तब्ध झाल्या. हा असा काही प्रकार असेल असं

त्यांना कधीसुद्धा वाटलं नव्हतं मिंकीलाही सारं ऐकून नवल वाटत होतं. सुनीला अशी असेल ? मिंकीनं सुनीलाकडे पाहायला आणि सुनीला मिंकीकडे पाहायला एकच गाठ पडली. आणि काय झालं हे कळायच्या आतच सुनीला रडायला लागली. अगदी मिंकीच्या गळ्यात पडून.

मिंकीला सुनीलाची दया आली. मामाला म्हणाली, " मामा सुनीला तशी चोरटी नाही रे. खरंच नाही. "

मामानं मिंकीच्या आणि सुनीलाच्या दोघींच्याही पाठीवर थोपटलं. तो म्हणाला, " मला माहीत आहे ते. लहान मुलं कधीच वाईट नसतात. त्यांना वाईट करतो आम्ही मोठी माणसं, कधी नकळत कधी जाणून-बुजून ! आमच्या स्वार्थासाठी. "

मामा काय आणि कशासाठी बोलतोय हे काही मिंकीला नीट समजलं नव्हतं. मामानं सुनीलाला चांगल म्हटलं याचंच तिला समाधान झालं. ती सुनीलाचे डोळे पुसून म्हणाली, " रडू नको सुनीला मामा तुला नाही रागवणार. रडू नकोस हं. "

मग मामानंही सुनीलाला जवळ घेतलं तिच्याशी तो नीट, गोड गोड बोलला, आणि त्यानं तिच्याकडून कितीतरी गोष्टी काढून घेतल्या. ढगेबाईंनी प्रथम सुनीलाला चोरी करताना पाहिलं होतं ते दोन वर्षांपूर्वी. एका मुलीच्या डब्यातला लाडू घेताना. पण त्यावेळी ढगेबाईंनी तिला म्हटलं होतं, " हे बघ, आज तू ही चोरी केली आहेस. मी ही गोष्ट बाईंना सांगितली तर काय होईल माहीत आहे नं ? "

सुनीला तर त्यावेळी एकदम रडायलाच लागली होती. हे सारं बाईंना समजलं तर त्यांनी नक्कीच तिला घरी पाठवलं असतं आणि मग आईनं तिला नक्की इतकं मारलं असतं. आईनं तर मारलं असतंच पण मामीनं तर अवघ्या आळीला सारं सांगितलं असतं. तिच्याशी कुणीच खेळलं नसतं. बोललंसुद्धा नसतं.

सुनीलानं ढगेबाईंना मिठी मारली होती, आणि म्हणाली होती, " बाई मी पुन्हा नाही असं करणार, खरंच करणार नाही. पण तुम्ही हे कुणाला सांगू नका. "

ढगेबाईंनी तिला आपल्या घरी नेलं होतं. तिची ही चोरी त्या कुणाला सांगणार नव्हत्या. पण त्या बदल्यात त्यांनी तिच्याकडून त्या जे जे सांगतील ते ते करायचं कबूल करून घेतलं होतं. कुणाची घड्याळं, कुणाच्या अंगठ्या, कुणाचं पेन, कुणाचे डूल, साखळी असलं बरंचसं काही ती बाईंना देत होती. मिंकीची मोटार मात्र तिनंच चोरली होती. ते बाईंना माहीतही नव्हतं. ती मोटार तिला खूप आवडली होती. खरं म्हणजे तिला ती वॉकीटॉकी बाहुली हवी होती, पण ती लपवता आली नसती म्हणून मग तिनं फक्त मोटारच लपवून ठेवली होती.

सुनीला सारं सांगत होती आणि त्या लबाड ढंगाळेबाई मधून मधून ओरडत होत्या, " खोटी मेली, असं सांगतेस काय ? थांब, लक्षात ठेव, याचा परिणाम तुला भोगायला लागेलच. काय समजलीस तू ! "

मामा फक्त रोखून ढगेबाईंच्याकडे पाहात होता. त्यानं मिंकीला विचारलं, " मिंके, तू जे गोळा केलं आहेस, ते सारं मला इकडं आणून दाखव बरं. "

मिंकीनं आणि उषानं आपली ती दौलत मामापुढे ठेवली होती. मघा त्या माणसांना पाहून उषा पळाली होती. पण पळता पळता तिला एक किल्ली सापडली होती. गंजली होती ती. पण तीही तिनं उचलून आणलेली होती. ते सारं मामाच्या पुढ्यात ठेवून उषा म्हणाली होती, " आणि मामा आमच्या वरच्या गच्चीत मला एक वायरचा तुकडाही मिळाला होता. ज्याला आपण बारीक दिवा लावतो ना, तसल्या दिव्याचं एक बटण होतं. माझे बाबा त्याला बेड स्वीच म्हणतात. "

" कुठं आहे तो वायरचा तुकडा ? " मामानं विचारलं.

" मी तो सर्वांना दाखवला. पण बाईंनी तो काढून घेतला. म्हणाल्या, " नाही त्या गोष्टी हव्या कशाला तुला ? "

ढंगाळेबाई रागानं नुसत्या चरफडत होत्या. हे असलं काही कधी घडेल असं त्यांच्या स्वप्नातही आलेलं नव्हतं. त्या मिंकीकडे तर खाऊ का गिळू अशा नजरेनं पाहात होत्या. मिंकी मात्र मोठ्या ऐटीनं त्यांच्याकडे पाहात उभी होती. तिच्या मामानं सारं उघड केलं होतं याचा तिला मोठा अभिमान वाटत होता.

मुलींच्या समोर ढंगाळेबाईंची छान फजिती झाली होती. सगळ्या मुलींना मनापासून आनंद झाला होता. मुलींच्या समोर बाईंच्या घरात सापडलेल्या वस्तू मामानं आणून ठेवल्या होत्या. हरवलेल्या सगळ्याच गोष्टी त्यात नव्हत्या. पण बऱ्याचशा होत्या. आपापल्या वस्तू मुलींनी ओळखल्या.

मग मामा ढंगाळेबाईंना घेऊन गेला. मोठ्या बाईही आल्या. त्यांनी मुलींना धीर दिला. म्हणाल्या, " घाबरू नका. तुमचं जे हरवलं असेल ते बहुतेक सर्व मिळेल. आपण नीट तपास करू. मला मात्र वाईट वाटतं, मी तुम्हाला त्रास द्यायला कारण झाले. माझी निवड चुकली.

मोठ्या बाई असं म्हणाल्या मात्र, सगळ्या मुली एका सुरात म्हणाल्या, " नाही बाई, नाही. तुमचा काहीही दोष नाही. हे सारं त्या ढंगाळेबाईंनी केलंय. "

" असं बोलू नाही. त्यांचं नाव ढगे आहे. "

" मग बाई, ही सुनीला, त्या ढंगाळेबाईसुद्धा तुम्हाला कधी कधी टंगाळे का म्हणतात ? मग आम्हीसुद्धा त्यांना ढंगाळेच म्हणणार. "

मिंकीनं मोठ्या जोषात बाईंना सांगितलं. बाईंनी मिंकीच्या पाठीवर थोपटलं. नेहमीसारखंच. मोठ्या मायेनं. आणि त्या म्हणाल्या, " मिंके दुसऱ्यानं चोरी केली म्हणून आपणही चोरी करावी असं तुला वाटतं

का ?"

"नाही हं बाई, असं कसं वाटेल हो मला. मी काय चोरटी आहे ? पण त्या तुम्हाला वाईट्ट म्हणायच्या, मग आम्हाला राग यायचा. हो किनई ग ?"

आणि जमलेल्या साऱ्या मुलींनी एका सुरात मिंकीला 'हो' म्हणून उत्तर दिलं होतं. बाई हसून म्हणाल्या, "बरं बरं, आता जरा शांत बसा. मी खाली ऑफिसमध्ये जाऊन पाहाते काय प्रकार आहे तो. आता भ्यायचं मात्र काही कारण नाही हं. भूत पळालं खरं ना इथलं ? काय ग मिंके ? सापडलं का भूत मग अखेर ?"

मिंकीनं किंवा आणखी कुणी उत्तर देण्यापूर्वीच बाई खाली निघून गेल्या. त्या साऱ्या मुली एकाच हॉलमध्ये गोळा होऊन बसल्या होत्या. आजची सुट्टी मोठी मस्त, खळबळीची ठरली होती. ज्या आपल्या नातेवाईकांच्या घरी गेल्या होत्या, त्या साऱ्या या गंमतीला मुकल्या होत्या.

त्या साऱ्या अशा काहीतरी बोलत होत्या. प्रत्येकजण एकेक गोष्ट सांगत होत्या. आलेले एकेक अनुभव ऐकवीत होत्या. गच्चीवर रात्री, अपरात्री पावलं वाजल्याचं कितीतरी जणींनी स्पष्ट ऐकलेलं होतं. एकदा एकीनं अगदी स्पष्ट असा घुंगरांचा आवाजही ऐकला होता. हे सारं काय होतं ते मात्र अजून नीटसं उलगडलं नव्हतं. त्याबद्दलच मग त्या साऱ्याजणी त्याच त्या गोष्टी पुन्हा पुन्हा घोळूनघोळून बोलत होत्या. मिंकी सारं ऐकत होती. आता खाली काय काय झालं असेल याचा विचार करीत होती.

त्या दिवशी त्या मुलींना काहीच कळलं नव्हतं. पण दुसऱ्या दिवशी पेपरमध्ये मोठी बातमी. त्यांच्या शाळेचं नाव, वसतीगृहाचं नाव आणि ढगेबाई आणि ज्ञानूचं नाव. सगळं काही वेगळंच होतं. शाळेत येणाऱ्या प्रत्येक मुलीच्या तोंडी तोच विषय होता. त्यांच्या शाळेच्या मागच्या

बाजूच्या जागेत एक मोठा चोरट्या मालाचा अड्डा होता. त्या खाणाखुणा केलेला तो कागद म्हणजे कुठला माल द्यायचा याची यादी होती मिंकीला सापडलेली. मिंकीला वाटलं होतं ती भुताची किंवा राक्षसाची लिपी असावी. तसं तिनं मामाला कळवलं होतं. आणि तिच्या पोलीस मामानं त्याचा बरोबर अर्थ लावला होता.

बाप रे ! सारं ऐकून मुली अगदी गोंधळून गेल्या होत्या. त्यांच्या चोरीला गेलेल्या वस्तू आता मिळणार होत्या. ढगेबाईंनी त्या वस्तू कु कुणाला विकल्या होत्या. ढगेबाई पैशाच्या फार हावऱ्या होत्या. म्हणून त्या या असल्या टोळीच्या तावडीत सापडल्या होत्या. त्यांनीच ज्ञानू माळी म्हणून इथं आणला होता. तो त्यांच्या गावचा, त्यांच्या शेजारच होता. दोघं मिळून त्या लबाड व्यापाऱ्यांना मदत करीत होते. त्यां खूप श्रीमंत व्हायचं होतं.

आणखी एक गोष्ट मुलींना समजली होती. त्यांना बेबीची द आली होती. या बेबीचे वडीलच हा चोरटा व्यापार करीत होते. त टोळीपैकीच ते एक होते. बेबीला ते भेटत नव्हते. पण बेबीच्या नावान पत्रं यायची, ती ढगेबाईच घ्यायच्या. वसतीगृहाच्या नियमाप्रमाणे सार पत्रं बाईंच्या ऑफिसमधून ढगेबाईंच्याकडे यायची आणि मग मुलीं मिळायची. बेबीची पत्रं ढगेबाई घेत होत्या, वाचीत होत्या. त्यांना ह तो निरोप मिळत होता. सारं काम व्यवस्थित होत होतं.

घरी आल्यापासून सारं तेच मिंकीला आठवत होतं. कधी ती ह यची. कधी तिला बेबी–सुनीलाचं वाईटही वाटायचं. बिचाऱ्यांना काहीच कळत नव्हतं. ती आजीला म्हणायची, " आजी आता तू म लाडू पाठवशील ना, ते खूप खूप पाठव. मी सगळा डबाच सुनीला देईन. बिचारीला लाडू मिळाला खरा, पण किती त्रास झाला नाही ग

आजी तिच्या केसातून हात फिरवीत म्हणायची, " मिंके, पुरं झाल



BVBK-0401800